सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १९ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक १८ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पंतप्रधान आणि मस्क यांच्या कॉल्स नंतर भारतात टेस्ला येण्याचे संकेत

नवी दिल्ली : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अनेक परदेशी दौरे करतात. या दरम्यान ते अनेक नवीन माणसांना भेटतात अनेक वेगवेगळ्या गोष्टींवर चर्चा करतात. फेब्रुवारी २०२५ मध्ये पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. या काळात, ट्रम्प यांच्यासोबत, ते मस्क यांनाही भेटले. त्यानंतर आज (दि १८) पंतप्रधान मोदी यांनी टेस्ला आणि स्पेसएक्सचे मालक एलॉन मस्क यांच्याशी फोनवर चर्चा केली.



या संभाषणात दोघांनीही भारत आणि अमेरिका यांच्यातील तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात एकत्र काम करण्याची इच्छा व्यक्त केली. मोदींनी या वर्षाच्या सुरुवातीला वॉशिंग्टन डीसी येथे झालेल्या त्यांच्या भेटीची आठवण करून देत अनेक मुद्द्यांवर चर्चा केली. या संभाषणात, भारतातील वेगाने वाढणाऱ्या तंत्रज्ञान क्षेत्र आणि मस्क यांच्या कंपन्यांमधील वाढत्या सहकार्यावरही विशेष लक्ष देण्यात आले. पंतप्रधान मोदींनी एक्स पोस्टवर माहिती देत याबद्दल सांगितले आहे.

सोशल मीडियावर पोस्ट करत काय म्हणाले पंतप्रधान मोदी?

मी मस्क यांच्याशी बोललो आणि या वर्षाच्या सुरुवातीला वॉशिंग्टन डीसीमध्ये भेटलेल्या मुद्द्यांसह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या प्रचंड क्षमतेवर आम्ही चर्चा केली. भारत या क्षेत्रात अमेरिकेसोबतची भागीदारी आणखी मजबूत करण्यास पूर्णपणे तयार आहे.

## महाराष्ट्रातील नवीन पिढीला 'मराठी आली नाही' तरउपमुख्यमंत्री पवारांचा इशारा

पुणे : मराठी भाषेच्या मुद्द्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी परखड मत व्यक्त केलं आहे. महाराष्ट्रात राहायचं असेल तर नवीन पिढीला मराठी आलीच पाहिजे, असं परखड मत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केलं आहे. आपली मातृभाषा ही मराठी आहे. त्याबद्दल आपुलकी आणि जिव्हाळा आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळालेला आहे. अभिजात दर्जा देण्याचे धाडस केवळ मोदींनी केल्याचा उल्लेख देखील यावेळी अजित पवार यांनी केला आहे. अजित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मातृभाषेला नंबर एकच स्थान

अजित पवार म्हणाले, जगामध्ये बहुतांश देशात इंग्रजी भाषा बोलली जाते. भारतात हिंदी भाषा बोलली जाते. ती राष्ट्रभाषा आहे, यावरून अनेक वाद आहेत. मी त्यात जाणार नाही. परंतु, ज्या पद्धतीने बहुतांश देशांमध्ये इंग्रजी बोलली जाते त्याचप्रमाणे तिन्ही भाषा बोलल्या पाहिजेत. आपण महाराष्ट्रात राहतो त्यामुळे आपल्या मातृभाषेला नंबर एकच स्थान आहे.

अजित पवारांनी नाशिक येथे झालेल्या दंगली वरून देखील भाष्य केलं. या प्रकरणात जो कोणी दोषी आढळेल त्याच्यावर कारवाई केली जाईल. महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्था महत्त्वाचा आहे. तो कुठल्या राजकीय पक्षाचा, पार्टीचा असला याच्याशी आम्हाला देणंघेणं नाही. त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेसाठी त्याची खैर केली जाणार नाही. असे अजित पवारांनी नमूद केलं.

## नाशिकमध्ये हिंसा, ३८ अटकेत; एमआयएमच्या शहराध्यक्षाला अटक

नाशिक : नाशिक - पुणे मार्गावरील काठे गल्ली सिग्नलजवळ असलेल्या अनधिकृत दर्ग्यावर महापालिका प्रशासनाने कारवाई केली. अनधिकृत बांधकाम प्रकरणी दर्ग्याच्या व्यवस्थापनाला कायद्यानुसार महापालिकेने नोटीस बजावली होती. पण महापालिकेने कारवाई सुरू करताच मुसलमानांनी घटनास्थळी जमून पोलिसांवर दगडफेक केली. कारवाईला विरोध करण्यासाठी दंगल करण्यात आली. पोलिसांवर हल्ले करण्यात आले. या प्रकरणी आतापर्यंत ३८ जणांना अटक करण्यात आली आहे. ज्या भागात दंगल झाली तिथे पोलीस बंदोबस्त ठेवून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे. दंगल प्रकरणाचा तपास सुरू आहे. कारवाईला विरोध करण्यासाठी अल्पावधीत मोठा जमाव आला कसा आणि सतत हल्ले करण्यासाठी दगड आणि शस्त्रे आली कुठुन ? या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी पोलीस तपास करत आहेत.



पोलिसांनी हिंसाचार प्रकरणी एमआयएम शहराध्यक्ष मुख्तार शेखला अटक केली आहे. काँग्रेस पदाधिकारी हनीफ बशीर, उद्धव गटाचे निलोफर शेख आणि शरद पवार गटाचे आरिफ हाजी नॉट रिचेबल झाले आहेत.

नाशिकमधील हिंसेप्रकरणी १५०० जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींमध्ये काँग्रेस पदाधिकारी हनीफ बशीर, उद्धव गटाचे निलोफर शेख आणि शरद पवार गटाचे आरिफ हाजी यांचाही समावेश आहे. या आरोपींच्या विरोधात कट रचणे, अफवा पसरवणे, प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष हिंसाचार घडविण्यात सहभाग असल्याचा आरोप ठेवून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दर्ग्यावरील कारवाईला विरोध म्हणून पोलिसांवर हल्ले करण्यात आले होते. या हल्ल्यांमध्ये २१ पोलीस जखमी झाले होते. अनेक पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाले होते. दंगल करणाऱ्यांनी ३० वाहनांची नासधूस केली. घातक शस्त्रे, लाठ्या-काठ्या, दगड, विटा आणि फरशांनी पोलिसांवर हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणात मोबाइल व्हिडीओ, परिसरातील सीसीटीव्ही आणि इतर पुराव्यांच्या आधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## आत्मक्लेश आंदोलन व नुतन कार्यकारणी संदर्भात काँग्रेसची परळीत आज बैठकीचे आयोजन - बहादूरभाई



परळी प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य काँग्रेस कमिटीच्या आदेशानुसार राज्यभर आत्मक्लेश आंदोलन आंदोलन करण्यात येणार असून त्या तयारी संदर्भात व नवीन कार्यकरणी करण्याबाबत बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे,पक्ष निरीक्षक अमर खानापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले असुन या बैठकीला काँग्रेस पक्षाच्या सर्व आघाडी, सेलच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रभारी शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी केले आहे. शनिवार दि.१९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.३०: वाजता इम दादूल उलूम स्कूल पावर हाऊस जवळ या ठिकाणी आत्मक्लेश आंदोलन संदर्भात व तसेच परळी तालुका काँग्रेस कमिटी व परळी शहर काँग्रेस कमिटीच्या नविन कार्यकारणी निवडी संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या बैठकीस बीड जिल्हा काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष राहुल भैया सोनवणे साहेब , पक्ष निरीक्षक अमरजी खानापुरे साहेब यांच्यासह वरीष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.तरी परळी तालुका व शहर कार्यक्षेत्रातील सर्व आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, इच्छुक सहकाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन प्रभारी शहराध्यक्ष बहादूरभाई यांनी केले आहे.

## ३ बड्या बँकांवर आरबीआयची कारवाई

नवी दिल्ली : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया राज्यातील नियमांचे उल्लंघन करणारे किंबा आर्थिकदृष्ट्या डबघाईला आलेल्या बँकांवर कारवाई करते. मागील महिन्यात आरबीआयने एचडीएफसीसह बँक ऑफ महाराष्ट्र बँकेवर कारवाई केली होती. त्यानंतर आता आणखी ३ मोठ्या बँकांवर आरबीआयने धडक कारवाई केली आहे. मात्र यामुळे खातेधारकांच्या ठेवींवर काही परिणाम तर होणार नाही? असा प्रश्न सामान्य खातेधारकांना पडत आहे.

आरबीआयने कोटक महिंद्रा बँक, पंजाब नॅशनल बँक आणि आयडीएफसी फर्स्ट बँक या बँकांवर कारवाई केली आहे. दरम्यान, आरबीआयने तिन्ही बँकांवर ही



कारवाई करत असतानाच त्याची सर्वतोपरि जबाबदारी बँकांची असून बँकांच्या खातेधारकांवर या कारवाईचा कोणताही परिणाम होणार नाही असे म्हटले आहे.

आरबीआयकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत निवेदनानुसार, कोटक महिंद्रा बँकेकडून 'कर्ज वितरणासाठी कर्ज प्रणाली'चे निर्देश तसंच 'कर्ज आणि आगाऊ वैधानिक', इतर निर्बंधांसंदर्भातील सूचनांचं पालन न केल्यामुळं बँकेला ६१.४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर, 'बँकांमधील ग्राहक सेवा' संदर्भात आरबीआयनं दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचं पालन न केल्याने पंजाब नॅशनल बँकेवर २९.६ लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच केवायसी संदर्भातील काही सूचनांचं पालन न केल्याप्रकरणी आयडीएफसी फर्स्ट बँकेला आरबीआयनं ३८.६ लाखांचा दंड ठोठावला आहे. शासनाने आखून दिलेल्या नियमांचं पालन होत नसल्याची बाब लक्षात येताच आरबीआय बँकांवर कारवाईचा बडगा उगारते. मात्र यावेळी खातेधारकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागणार नाही, याची दक्षतासुद्धा बँकेकडून घेण्यात येते.

## छत्तीसगडच्या सुकमामध्ये २२ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण



रायपूर, १८ एप्रिल : छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात एका नक्षल दाम्पत्यासह २२ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. शासनाच्या नक्षल सदस्य मुक्त ग्राम पंचायत अंतर्गत २२ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण करविण्यात पोलिसांना मोठे यश आले आहे.

आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांवर एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित करण्यात आले होते. आत्मसमर्पित १ पुरूष व १ महिला नक्सलीवर प्रत्येकी ८ लाख रुपये, एक पुरूष व एका महिला नक्षलवादीवर प्रत्येकी ५ लाख रुपये, तसेच २ पुरूष व ५ महिलांवर प्रत्येकी २ लाख रुपये आणि एका पुरूष नक्षलवाद्यावर ५० हजार असे एकूण ४० लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस घोषित होते. नक्षल्यांना आत्मससमर्पणासाठी डीआरजी सुकमा, रेंज फिल्ड टीम (आरएफटी) कोंटा, सुकमा, जददलपूर सीआरपीएफ व कोबरा यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आत्मसमर्पित नक्षल्यांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल होते.

## आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डींची ८00 कोटींची मालमत्ता जप्त

### मनी लाँड्रिंग प्रकरणी ईडीने केली कठोर कारवाई

हैदराबाद : तब्बल १४ वर्षे जुन्या मनी लाँड्रिंग प्रकरणात आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर कडक कारवाई करण्यात आली आहे. आंध्रप्रदेशातील युवाजन श्रमिका रायथू काँग्रेस पक्षाचे (वायएसआर-काँग्रेस) प्रमुख जगन मोहन रेड्डी यांच्याविरुद्धच्या चौकशीदरम्यान अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) ८०० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

यासंदर्भातील माहितीनुसार जगन मोहन रेड्डीच्या जप्त केलेल्या शेअर्सची किंमत सुमारे २७.५ कोटी रुपये आहे. याशिवाय, दालमिया सिमेंट्स (भारत) लिमिटेडची (डीसीबीएल) जमीन देखील जप्त करण्यात आली आहे. या जमिनीची किंमत अंदाजे ३७७.२ कोटी रुपये आहे. दालमिया यांनी जप्त केलेल्या



मालमत्तेची एकूण किंमत ७९३. कोटी रुपये आहे आणि ईडीने १४ वर्षांनंतर ही कारवाई केली आहे. मनी लाँड्रिंगचे हे संपूर्ण प्रकरण फायदे मिळवण्याच्या उद्देशाने दिलेल्या मदतीबद्दल आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) २०११ मध्ये या प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. सीबीआयने दाखल केलेल्या खटल्यानुसार ईडीने आता तात्पुरती मालमत्ता जप्त करण्याची कारवाई केली आहे.

सीबीआयने २०१३ मध्ये जगन मोहन रेड्डी, डीसीबीएल आणि काही इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. त्यांच्यावर भ्रष्टाचाराशी संबंधित भारतीय कायदे आणि नियमांनुसार आरोप ठेवण्यात आले. या प्रकरणात ईश्वर सिमेंट्सच्या खाणकामाच्या जमिनीचे डीसीबीएलला हस्तांतरण करण्याचाही समावेश आहे. तपास यंत्रणांचे म्हणणे आहे की जगन रेड्डी यांनी त्यांचे जवळचे सहकारी व्ही. विजया साई रेड्डी आणि डीसीबीएलचे पुनीत दालमिया यांच्यासह रघुराम सिमेंट्स लिमिटेडमधील त्यांचे शेअर्स फ्रेंच कंपनीला विकण्याचा करार केला होता. हा करार १३५ कोटी रुपयांना झाला होता. यापैकी ५५ कोटी रुपये जगन रेड्डी यांना हवालाद्वारे रोख स्वरूपात देण्यात आल्याचे सांगितले जाते. हे व्यवहार १६ मे २०१० ते १३ जून २०११ दरम्यान झाले. दिल्लीत जप्त केलेल्या काही कागदपत्रांवरून आयकर विभागाला या पैशाची माहिती मिळाली होती.

## पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा मिळण्यास वेळ लागणार : वसंत मुंडे

परळी ( प्रतिनिधी )... केंद्र व राज्यातील भाजप व मित्र पक्षाच्या महाराष्ट्रातील तिन्ही माजी कृषिमंत्र्यांनी खाजगी पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी घेतल्यामुळे न्यायालयाचे व शासनाचे आदेश असूनही शेतकऱ्याला २०२० पासून २०२५ पर्यंतचा पिक विमा शेतकऱ्यांना मिळण्यास वेळ लागणार असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.

केंद्रातील सरकारने २०१६ पासून शासनाच्या पिक विमा कंपन्या संदर्भातली संपूर्ण काम खाजगी कंपन्याला देऊन टाकले असून त्यामध्ये खाजगी कंपन्यांनी १० हजार कोटी पेक्षा जास्त मोठा घोटाळा शेतकऱ्याचे पिक विमा मध्ये केलेला आहे. खाजगी पिक



विमा कंपनीवर न्यायालयाचे आदेश असूनही नियमानुसार कारवाई केली जात नाही .त्याचे कारण आजी माजी कृषिमंत्र्यांना पिक विमा कंपन्याकडून टक्केवारी दिली गेलेली आहे. त्यामुळे राज्यातील त्रिमूर्ती सरकारकडून पिक विमा कंपन्या काळया यादीत टाकण्यासंदर्भात कारवाई केली जात नाही असा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे केला आहे. कृषी विभागाचे प्रधान सचिव यांनी भाजपच्या केंद्र सरकारकडे चार वेळेस पत्र व्यवहार केलेला आहे पण शेतकऱ्यांना पिक विमा देणे संदर्भात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आलेले नाहीत. प्रधानमंत्री पिक विमा योजनेसाठी वेगवेगळे निकष केंद्र व राज्य सरकारची नियमावली व पिके पेरणी पासून काढणे पर्यंतचा कालावधीमध्ये अतिवृष्टी वीज कोसळणे नैसर्गिक गारपीट वादळ चक्रीवादळ दुष्काळ पाऊस कमी पडल्याने शेतीचे उत्पन्नावर परिणाम होतो. पिक विमा संदर्भात शेतकऱ्याचे अनेक प्रकरणे राज्य सरकार मा. तालुका न्यायालय , जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात खाजगी पिक विमा कंपनीच्या व सरकारच्या विरोधात चालू आहेत, खाजगी पिक विमा कंपन्या बाबत आजतागायत शेतकऱ्यासाठी शासनाकडून कोणताही निर्णय दिला नसल्यामुळे पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होत नाहीत. कारण राज्यातील सर्वच आजी-माजी कृषीमंत्र्यांना टक्केवारी खाजगी विमा कंपन्याकडून घेतली आहे . सरकारकडून २० ते ३५ टक्के खाजगी पीक विमा कंपन्यांना कमिशन मिळते. त्रिमूर्ती सरकारने १ रुपयात पिक विमा भरण्या संदर्भात शेतकऱ्याला लोभ दाखवून शेतकऱ्याची खूप मोठ्या प्रमाणावर दिशाभूल केली . शेतकऱ्याचा टक्केवारीचा हिस्सा, केंद्र व राज्य सरकारचा अर्धा हिसा एकत्र करून पीक विम्याचे विविध निकषाचे नुकसान भरपाई संदर्भात पालन करून टक्केवारीनुसार वेगवेगळ्या पिकाचा पिक विमा शेतकऱ्याला दिला जातो. त्यामध्ये खाजगी पिक विमा कंपन्यांनी पर्जन्यमापक यंत्रणा व हवामान केंद्राचे अधिकारी तसेच महसूल, कृषी अधिकारी यांच्यासोबत तोडजोड करून लोकप्रतिनिधी व कृषी मंत्री कृषी आयुक्त सांख्यिकी विभागाचा प्रमुख यांच्याबरोबर आर्थिक तोडजोड करून शेतकऱ्याला पिक विमा वाटप न होऊ देण्याचे खरे कारण टक्केवारी असल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . पिक विमा संदर्भात शेतकऱ्यांसाठी एनडीआरएफ व एस डी आर एफ निकषचे पालन खाजगी पिक विमा कंपन्या करीत नाहीत. न्यायालयाचे शासनाला आदेश पीक विमा शेतकऱ्यांना वाटप करण्यासंदर्भात दिलेले असतानाही शेतकऱ्याला पिक विमा वाटप करण्याबाबत कंपन्या अडथळे करीत असल्यामुळे त्रिमूर्ती सरकारने नियमानुसार खाजगी पिक विमा कंपन्या काळा यादीत टाकण्याचे आदेश काढावेत अशी मागणी शासनाकडे काँग्रेसनेते वसंत मुंडे यांनी केली आहे.

## चापेकरांच्या बलिदानानंतर देशात क्रांतिकारकांची फळी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### चापेकर वाड्यातील राष्ट्रीय संग्रहालयाचे लोकार्पण

पिंपरी चिंचवड, दिनांक १८ एप्रिल : रँडच्या वधानंतर फाशीवर जाताना चापेकर बंधुंना क्षणभरही पश्चाताप अथवा भिती वाटली नाही. त्यांच्या बलिदानातून देशात क्रांतिकारकांची मोठी फळी उभी राहिली. दुर्दैवाने आपल्याला आज बोटावर मोजण्याइतकेच क्रांतिकारक परिचित आहे, अशी खंत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. देशाच्या स्वातंत्र्यात क्रांतिकारकांच्या बलिदानाचा मोठा वाटा आहे. पंतप्रधानांच्या प्रयत्नांतून अपरिचीत अशा साडे बाराहजार क्रांतिकारकांची गाथा देशासमोर येत असल्याचेही ते म्हणाले.




क्रांतिवीर चापेकर बंधुंच्या वाड्यातील संग्रहालयाचे लोकार्पण आणि राष्ट्रीय संग्रहालयाच्या दुसऱ्या टप्प्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री जयकुमार रावळ, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, आमदार प्रशांत बंब, माजी खासदार अमर साबळे, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष गिरीश प्रभुणे, महापालिका आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते. चापेकर वाडा येथील राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलमला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी भेट दिली. त्यानंतर प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. चापेकर बंधुंनी क्रांतिकार्याबरोबरच समाजसुधारणांचेही कार्य केल्याचे गौरवपुर्ण उद्गार मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढले. ते म्हणाले, स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहचायला हवा. त्यासाठी चापेकर स्मारकाला विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या तर संस्कार होतील. चापेकर बंधुंचे स्मारक हे अप्रतिम आणि प्रेरणा देणारे असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. ते म्हणाले, चापेकर बंधुंनी केलेला रँडचा वध हा जनजागृतीची ठिणगी आणि देशाभिमानाचा हुंकार होता. अशा स्वातंत्र्यवीरांच्या त्याग, बलिदान आणि समर्पणातूनच देश घडला आहे. त्यातूनच देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व कायम आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश प्रभुणे यांनी केले. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संदेश पाठवून चापेकरांना श्रद्धांजली अर्पण केली.

समरसता गुरूकुलम सामाजिक उत्थानाचे केंद्र

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुनरुत्थान समरसता गुरुकुलमला भेट दिली. वंचित समाजातील विशेषतः पारथी समाजातील विद्यार्थ्यांची निवासी शाळा असलेल्या या गुरूकुलातील विद्यार्थ्यांशी त्यांनी संवाद साधला. पारंपारिक कौशल्यांबरोबरच विद्यार्थी आधुनिक कौशल्य आणि कला आत्मसात करत आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,वंचित समाजाला पायावर उभे करणारा आदर्श आणि उत्तम नमुना म्हणजे हे गुरुकुलम् आहे.

असे आहे चापेकरांचे स्मारक :

दामोदर, बाळकृष्ण आणि वासुदेव चापेकर यांच्या पुर्वजांचे घर असलेल्या ठिकाणी हे राष्ट्रीय संग्रहालय उभे आहे. ज्यामध्ये चापेकर बंधुंचा संघर्ष आणि स्वातंत्र्यातील बलिदानाचे १३ भावस्पर्शी प्रसंगांचे सादरीकरण आहे. गुप्त बैठका, इंग्रजांच्या विरोधातील कट आणि जनतेसमोर केलेल्या क्रांतिकारक भाषणांचे क्षणही यात उभे करण्यात आले आहे. दृकश्राव्य ॲनिमेशनाचाही यात वापर करण्यात आला आहे. ज्याचे लोकार्पण आज झाले. तसेच चापेकर वाड्याच्या मागेच राष्ट्रीय संग्रहालयाचे कोनशिलेचे अनावरणही करण्यात आले. ज्यात पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून राष्ट्रीय संग्रहालय उभारण्यात येणार आहे. ज्यामध्ये भारताच्या प्राचिन काळापासूनचा सांस्कृतिक विकास आणि समाजाचे पुनरूत्थान मांडण्यात येणार आहे. ज्यात विज्ञान, कला, कौशल्य, इतिहास, पुरावे, पुरातत्वीय अवशेष, खगोलीय बदल आदींचा समावेश असेल. त्रिमितीय मॉडेल्स, एआर, प्रोजेक्शन स्क्रिन, दडगी भित्तीचित्रे यात असतील. महाराष्ट्र दिनापासून हे स्मारक सर्वांसाठी खुले होईल. यावेळी स्मारक समितीचे कार्यवाह ड. सतीश गोरडे, प्रांत संघचालक प्रा. नाना जाधव, जिल्हा संघचालक विनोद बन्सल, विश्वस्त मिलिंद देशपांडे, विश्वस्त आणि संघाचे पुणे विभाग कार्यवाह मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# चैतन्यदायी चैत्रगौर

चैत्रगौरीच्या हळदीकुंकवासाठी मानसीने यंदा जय्यत तयारी केली होती. तशीही महिला मंडळात तिच्या उत्साह व उत्सवप्रियतेची ख्याती होतीच. यंदा तर सुनेसोबत चैत्रगौरीचे हळदी कुंकू साजरे करण्याचा योग जुळून आल्याने तिच्या आनंदाला आणि तयारीला भरते आले होते. रिया ही परप्रांतीय असलेली तिची सून गुलाबदाणी बघून हरखूनच गेली. अत्तरदाणी, गुलाबदाणी, चांदीचे तबक, हळदी कुंकवाचे जाडजूड करंडे तिने मस्त चमकवून ठेवले होते. पिढीजात पितळी पाळण्यात सुबक, रेखीव चैत्रगौर, चैत्र शुद्ध तृतीयेला विराजमान झाली. तेव्हाही रियाला कोण अप्रूप वाटले होते. मानसीकडून सारे समजावून घेण्यात तिने जो रस दाखवला होता. त्याने मानसीला खूप समाधान लाभले होते. सारे काही समजावता ती नकळत आपल्या बालपणात गेली होती. तिला आठवली ती आपल्या आजोळच्या घरची चैत्रगौर! हळदी कुंकवाच्या दिवशीची आजीची लगबग, ओसंडून वाहणारी चेहऱ्यावरची प्रसन्नता! जणू आदिशक्ती माहेरवाशीण म्हणून महिनाभर हक्काने आली आहे तर, 'हळदीकुंकवास येणाऱ्या सवाष्णींनाही आपल्या घरी काही क्षण माहेर अनुभवायला मिळणारे हवेत गं!' असे काहीतरी माझ्याशी बोलत ती भली मोठी ट्रंक उघडून बसे. त्यातून सर्वप्रथम गर्भरेशमी सोन्याचांदीची जर असलेली तिच्या लग्नातील हिरवीकंच पैठणी हळुवार बाहेर काढायची. त्यावर आधी मायेने हात फिरवून एकदा माहेरच्या अंगणात जाऊन यायची. मग पाळी यायची, दागिन्यांच्या डब्याची. त्यातले एक दोन अलंकार आधी ती माझ्या गळ्यात घालायची मग घरातील लेकी-सुनांना बोलावून त्यांना त्यांच्या आवडीचे दागिने दिल्यावर आजी अलंकृत व्हायची. अन्नपूर्णेची पूजा करायची तर साऱ्यांना सुखावल्याचे तेज मुखी यावे, हाच माझा आवडीचा दागिना तू नक्की घे गं गौराई माझ्याकडून! असे म्हणत ती आपली दृष्ट काढत असे. हे आठवून मानसीचे डोळे पाणावले. तिनेही नकळत रियाची दृष्ट काढली. तिने अन्नपूर्णेची सविस्तर माहिती देऊन,

**'स्वयं पञ्चाननः पुत्रौ गजाननषडाननौ।**
**दिगम्बरः कथं जीवेदन्नपूर्णा न चेद्गृहे?'**
**अन्नपूर्णे सदापूर्णे शंकरः प्राणवल्लभे?**
**ज्ञान वैराग्य सिद्ध्यर्थं भिक्षां देहि च पार्वती?**

हे दोन श्लोक अर्थासहित सांगून तिला पाठ करायलाही सांगितलेत. शिवापासून ते विश्वातल्या सर्वांचे संसार घराघरातील अन्नपूर्णेमुळे उत्तमरित्या सुरू असतात. तिचे महत्व मनावर बिंबविण्यासाठी खरे तर हा चैत्रातला मांगल्य सोहळा घरोघरी आनंदाने केला जातो. ' गृहिणींच्या रुपात वावरणा?या अन्नपूर्णेच्या रूपालाही नमन करत पिढ्या घडत राहाव्यात हा उद्देश असावा असं मला वाटतं ग रिया बेटा! म्हणून मी चैत्रगौर मखरात बसवून थाटामाटात हळदी कुंकू करत असते.'

आमच्या लहानपणी गणेशोत्सवापेक्षाही जास्त सजावट चैत्रगौरीला केल्या जायची. उन्हाळा आला की आम्हाला वेध लागायचे सजावटीचे. कधी आमची गौर हिमालय पर्वतावर विराजमान व्हायची तर कधी डोंगरावर. भोवती दाट झाडी दिसण्यासाठी पंधरा वीस दिवस आधी बिया पेरून ठेवायच्या. वेळेवर झाडांच्या फांद्या फुले अनब काय काय विचारू नकोस ग ! टिन एजर्समध्ये नुसता उत्साह संचारायचा. तेव्हा शोकेसचा जमाना नसल्याने एका पेटीत भरून ठेवलेली खास खेळणी सजावटीसाठी बाहेर काढल्या जात. शेणाने सारवलेल्या अंगणात छान चैत्रांगण काढले जायचे. चैत्रांगणात ६४ शुभचिन्ह काढल्या जातात.

देवीची शस्त्रे म्हणून त्रिशूळ, गदा,शंख, चक्र ,नाग,आणि तिचे वाहन म्हणून हत्ती, कासव, गरूड . तिची सौभाग्याची लेणी फणी, करंडा, आरसा, मंगळसूत्र व सुवासिनींच्या ओटीचे ताट तिचे प्रिय तुळशी वृंदावन, गाय ॐ, स्वस्तिक, शंख, सूर्य, चंद्र, गोपद्म, कमळ इ. हिंदू धार्मिक महत्व असलेल्या आकृत्या काढल्या जातात. आंबा, श्रीफळ, उंबर- पिंपळ वगैरे पूजनीय वृक्ष ही हिंदू संस्कृतीची प्रतीके तीही रेखाटतात. शिवाय चैत्रांगणात मध्यभागी चैत्रगौरीचा पाळणा, गणपती, समई, नाभीकमळ असे सारे काही उत्साहाने महिनाभर काढल्या जायचे. हे ऐकताच रिया उडालीच. एका रांगोळीत इतकी चित्र



चितारायची म्हणजे तर कमालच ! रियाचा आपल्या संस्कृतीबद्दल आदर आणखी दुणावला आणि पूर्वीच्या स्त्रियांच्या कलात्मकतेची तिला नव्याने ओळख झाली. 'अग बेटा इतकेच नाही तर रोज देवीच्या नैवेद्याला गोड धोड करायचे. हळदी कुंकवाच्या दिवशी सगळ्यांसाठी कैरी घालून वाटलेली खमंग फोडणीची हरब?याची डाळ, कैरीचे ताजे पन्हे, बत्तासे, टरबूज,कलिंगड यासारखी फळे, भिजवलेले हरभरे असा नैवेद्य देवीला दाखवून येणा?या सर्वांना ते द्यायचे. शिवाय दिवाळीच्या फराळातील ताटलीभर आकाराचे मोठे अनारसे, चकल्या, शेव, करंज्या, शंकरपाळे हे सुद्धा आदल्या दिवशी नाही तर कोणी त्यादिवशी खास करतात.' असा हा आदिशक्तीच्या दातृत्वाचा सोहळा चैतन्याचे गीत गात सर्वांना प्रफुल्लित ठेवतो.

'बघ किती मॅनेजमेंट आहे ना या साध्याशा वाटणा?या हळदी कुंकवात !' चला तयार होवू आता येतील माझ्या सख्या म्हणून दोघीही तयारीला लागतात.

छान सजावटीसह रिया पुढाकार घेऊन चैत्र गौरीच्या हळदी कुंकवात मस्तपैकी पैठणी नेसून मनापासून सामील झाल्याने मानसीच्या मैत्रिणींच्या कौतुक वर्षावात न्हावून निघत अधिकच आनंदित होते. हळदी कुंकू आटोपल्यावर देवीला पुन्हा एकदा मनोभावे नमस्कार करून सगळ्यांना सुखद धक्का देते. आपण सगळे दोन चार दिवसांत बंगलोर जावूयात ! सुमेध तिकिटाचं बघ कधीचे मिळतात ते! 'अग पण तुम्ही दोघं महिनाभरासाठी आला होतात ना वर्क फ्रॉम होम घेवून. मग असं तडकफडकी जायचा निर्णय का घेतेस बेटा?' 'आई आम्ही दोघं नाही आपण चौघं जातोय. मुझे बंगलोर में भी करना है यह चैत्रगौर सभी फ्रेंड्स को बुलाकर' चैत्र गौरीसोबत तुम्ही सुद्धा तिथे माहेरवाशीण असणार आहात. आता आपलं ठरलं. दरवर्षी मी नागपूरला चैत्रात पंधरा दिवस माहेरवाशीण आणि पंधरा दिवस तुम्ही बंगलोरला. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' हे काय ते आज अनुभवताना आजीने दिलेला वसा आपल्या सुनेने इतक्या सहजतेने स्वीकारल्याने आजीचे चमकदार डोळे वरुन हे बघत समाधान पावले असतील असे मानसीला वाटून गेले. मनात कृतार्थ भाव दाटले अन घरोघरी अशीच आनंदाची चैत्रगौर पुन्हा नव्याने साजरी होवो सगळीकडे चैतन्याचा वास राहो हे देवीकडे नकळत मागणे मागितले. देवीही प्रसन्न हसल्याचा मानसीला भास झाला.

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३

**चैत्रात जशी पालवी बहरून येते,तशीच अक्षरपालवी लिखाणातून तुमच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी, आजपासून 'संगीतिका' हे नवीन सदर सुरू करीत आहोत. शीर्षकावरून विषयाचा अदमास तुम्हाला आला असेलच. अगदी बरोब्बर! छान हिंदी आणि मराठी गाण्यांबद्दल या सदरातून आपण संवाद साधू या. प्रभू श्रीरामांच्या आणि श्री हनुमंताच्या जन्मोत्सवाने पावन झालेल्या चैत्र महिन्याचे औचित्य साधून, या छानशा गीताने संगितीकाचा श्री गणेशा करू या!**

# आश्रमात या कधी रे येशील?

राममलालाच्या प्राण प्रतिष्ठापनेचा जल्लोष साऱ्या जगात साजरा झाला आणि अजूनही तो सुरूच आहे. त्याचं गारुड अजूनही काही कमी झालेलं नाही. प्रत्येकाच्या मनात हा आनंद अजूनही रेंगाळतोय. रामरायाचे संपूर्ण जीवनच एक आदर्श आहे. राम हे एक चिरंतन तत्व आहे, जे साऱ्यांच्या मनामनात आहे. या शब्दाचा अर्थ देखील 'चैतन्यानं व्यापलेली अवकाशातली पोकळी' असा होतो. रामायण बघताना, वाचताना आणि ऐकताना तर स्वतःचा देखील विसर पडतो. तसे तर संपूर्ण रामायणात खूप प्रसंग प्रेरित करतात. पण, मनाला खूप भावणारा प्रसंग आहे शबरीचा!


किती अद्भुत आहे ना मंडळी? दूर जंगलात राहणारी एक भिल्लीण पण, तिला विश्वास आहे की, तिचा राम तिच्यापर्यंत पोहोचणार. एक दिवस, अगदी नक्की पोहोचणार! तिची ही वाट बघण्याची आर्तता वर्णन करणारं हे गाणं आहे.

'सुखाची सावली' या वर्ष १९६३ मध्ये प्रदर्शित चित्रपटातील ! गीत रचना ग.दि.माडगूळकरांची तर संगीत दिलंय दत्ता डावजेकर ! या दिग्गजांच्या स्वर्गीय सादरीकरण म्हणजे 'रामा रघुनंदना, आश्रमात या कधी रे येशील? रामा रघुनंदना...' हे गीत!

किती आर्तता आहे ना यात मंडळी? कधीही गाठभेट न झालेला रामराया! पण, तो माझ्या या झोपडीवजा आश्रमात नक्की येणार , हा विश्वास मनात बाळगणारी ही शबरीदेखील तितकीच धन्य म्हणावी लागेल, नाही का? किती मन हेलावून टाकणारा असेल हा प्रसंग! जातीधर्माच्या नावावर गळे काढणाऱ्यांनी तर हा प्रसंग नक्कीच आठवावा. एका भिल्लीण मातेचा विश्वास खरा करण्यासाठी, राम दूर जंगलातदेखील तिच्यापर्यंत पोहोचला. आपली व्याकुळता शबरी कशी व्यक्त करते बघा...

**'मी न अहल्या, शापित नारी**
**मी न जानकी, राजकुमारी**
**दीन, रानटी, वेडी शबरी...**
**तुझ्या पदांचे, अखंड चिंतन,**
**ही माझी साधना, रामा रघुनंदना...**

किती प्रांजळपणे ती मन व्यक्त करते आहे. ती म्हणतेय की, अहिल्यासुद्धा भाग्यवान,



रामाच्या पदस्पर्शाने तिचा पण उद्धार झाला. प्रत्यक्ष जानकी जी राजकुमारी इतकी भाग्यवान की, तिला रामरायाचा आयुष्यभराचा नव्हे, साता जन्माचा सहवास लाभला! शबरी म्हणते की, माझं भाग्य या दोघींएवढं थोर नाहीये रामा की, मला तुझा सहवास लाभेल. मी तर दूर जंगलात राहणारी, एक वेडी, दीन भिल्लीण! तिला रामनामाशिवाय बाकी काही ठाऊक नाही. पण, फक्त एक गोष्ट तिला ठाऊक आहे, रामाच्या चरणांचे स्मरण! रामाच्या दर्शनाची मनात असणारी आस, आत्मविश्वास आणि हिच तिची अखंड साधना आहे.

हा आशावाद तिला जगण्याचं प्रचंड बळ देत आला आहे. तिची वाट बघण्याची आर्तताच तिची शक्ती ठरली.

रामकथाकार कुमार विश्वास म्हणतात,'राम वन मे केवल रावण को मारने नही आया है. बल्की आने वाले इतिहास को ये बताने आया है की, प्रतीक्षा अवश्य पुरी होती है !'इकिती दुर्दम्य आशावाद आहे यात!

**'पतीत पावना श्री रघुनाथा,**
**एकदाच ये जाता जाता,**
**पाहीन, पूजीन, टेकीन माथा...**
**तोच स्वर्ग मज, तिथेच येईल**
**पुरेपणा जीवना, रामा रघुनंदना...**

स्वतःला पतीत म्हणणारी शबरी, रामाच्या पावन दर्शनाची आस मनात बाळगून आहे. त्यानं फक्त एकदा तिच्यापर्यंत यावं. रामाच्या चरणावर शबरीला माथा टेकवता यावा, यातच तिच्या अवघ्या जन्माची सार्थकता तिला वाटते. यासमोर तिला स्वर्गही अगदी फिका वाटतो. अशी ही इतकी आर्तता, व्याकुळता असावी तेव्हा कुठे 'प्रतिक्षा अवश्य पुरी होती है!' भक्तांच्या मनात असणारी ही व्याकुळता भगवंताला नक्की उमजतेच.

किती समर्पण भाव आहे या सगळ्यात शबरी मातेचा! आपल्यालाही भगवंत गवसतो. मनात शबरी मात्र जपता आली पाहिजे. तिच्या विश्वासासकट जपता आली पाहिजे. मंडळी, असाच दुर्दम्य आशावाद आपणही मनामनात पेरायला हवा.

जगण्यात चढउतार येतच राहणार. पण, अंतर्मनात असणाऱ्या चिरंतन रामतत्त्वावर विश्वास ठेवून, कायम प्रयत्नरत राहिलं की, शबरीसारख्या आपल्याही प्रतिक्षा पूर्ण होतीलच.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# आख्यान काव्याची ओळख

आख्यान म्हणजे कथा किंवा गोष्ट ! प्राचीन मराठी संत काव्य आणि पंडिती काव्य या दोघांच्या परंपरेत वाढलेला हा कथा काव्याचा एक प्रकार आहे. देव देवता, महापुरुष हे विषय सहसा कीर्तनाचे असतात. आख्यानात एखाद्या गोष्टीचे वर्णन केले जाते. आख्यान म्हणजे वर्णन! वृत्तांत सांगणे! सुचित करणे! आख्यान या शब्दाचा वापर संस्कृतमध्ये कथा सांगताना केला जातो. आख्यान आणि व्याख्यान या दोन्ही शब्दात फार मोठा फरक आहे. आख्यान हे कीर्तनाच्या दरम्यान उत्तर रंगात सांगावयाची बहुधा पौराणिक कथा असते. पूर्वरंगात मांडलेल्या वर्ण्य विषयाला अनुसरून ही त्याला पोषक अशी कथा असते. मात्र, व्याख्यान हे जाहीर केलेल्या विषयावर मांडलेले, तर्कनिष्ठ, मुद्देसूद, विचारांवर आधारलेले भाषण असते. त्यात ओघाने एखादी गोष्ट येऊ शकते पण, मूळ व्याख्यानात अभ्यास केलेले मुद्देच स्पष्टपणे मांडलेले असतात. अर्थात, याबद्दल अनेक विचारवंतांची मते वेगळी असू शकतात.

रघुनाथ पंडितांना, आख्यान लिहिणारे एक प्रमुख अभ्यासक मानले जाते. त्यांनी 'दमयंती स्वयंवराख्यान' लिहिले आहे आणि ते अतिशय लोकप्रिय आहे. रघुनाथ पंडित हे सतराव्या शतकातील मराठी कवी! देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात त्यांचा जन्म झाला. या कालखंडात मराठी कविता अशा एका टप्प्यातून गेली की, तिथे धार्मिकता अधिक प्रमाणात आढळून येते. मराठी आख्यान काव्याचा विस्तार व विकास हा मोरोपंतांच्या आर्या व इतर आख्यानातून दिसून येतो. नाट्यपूर्ण कथा निरूपण, मार्मिक स्वभाव चित्रण आणि त्यांना दिलेली प्रौढ शैलीची जोड या गुणांचे आख्यानात, वैपुल्याने दर्शन घडवणारा मोरोपंत हा कवी आहे. प्राचीन काळी गद्यरचनेचा फारसा परिपाठ नव्हता. त्यामुळे, तत्कालीन कथात्मक साहित्य पद्यातूनच विकसित झाले. परिणामतः मराठी आख्यान काव्यास बराच वाव मिळाला. याशिवाय, नाथ, महानुभाव, भागवत, दत्त, रामदासी यासारख्या पंथोपपंथांनी जे धार्मिक आचार-विचार आणि तत्त्वज्ञान समाजात प्रसृत करण्याचा प्रयत्न केला, त्यालाही कथा रूपाने जोड देणे आवश्यक होते.

मराठी आख्यानकाव्याने तत्कालीन धार्मिक तत्त्वज्ञानाला मनोरंजक आणि सुबोध केलं. शिवाय, ते सामान्य लोकांच्या आवाक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पंडित कवींनी शुद्ध काव्यदृष्टीने मराठी आख्यान काव्याचे कलात्मक अंग विकसित करण्याचा प्रयत्न केला. कथाकथनाची आणि कथाश्रवणाची मुलभूत मानवी प्रकृती आणि प्रवृत्ती अखंडपणाने मराठी आख्यान रूपाने प्रकट होत राहिली व तृप्त होत गेली. म्हणूनच मराठीमध्ये एक मोलाचा ठेवा म्हणून मराठी आख्यान काव्य नेहमीच महत्त्वाचे मानले जाते. विशेषतः त्यातून विखुरलेली कल्पना सौंदर्याची आणि भावोत्कट अभिव्यक्तीची स्थळं आणि कथा रचनेचे काही सुंदर घाट हे आधुनिक रसिकालाही मोहणारे आहे.



मंडळी, पूर्वी कीर्तन हे फक्त मंदिरात होत असे. परंतु, प्रथमच कीर्तन वाळवंटात आणले ते संत नामदेव महाराजांनी! संत साहित्यामुळे कीर्तन समृद्ध झालं असं म्हणायला काहीच हरकत नाही. आजही कीर्तनाला संत साहित्याचा भक्कम असा पाठिंबा आहे. पुढे कीर्तनाला संगीताची साथ लाभली. टाळ, मृदंग, एकतारी, चिपळ्या ही वाद्ये पूर्वापार कीर्तनात साथीला असत. पण, हल्ली पेटी-तबला यासोबतच कधी बासरी तर कधी व्हायोलिन सुद्धा वापरली जातात. कीर्तनाच्या दरम्यान म्हटल्या जाणाऱ्या पदांच्या अतिशय सुंदर, सुमधुर, लोकप्रिय चाली हा कीर्तनाचा एक जमेचा भाग आहे. इष्ट देवतेची प्रार्थना किंवा तिचे गुणवर्णन हा कीर्तनाचा विषय असून, भक्ति रसाचा परिपोष करणे, हे त्याचे उद्दीष्ट असते. संगीतरचनेपेक्षा इथे गीतरचना महत्वाची ठरते. याचाच अर्थ की, कीर्तनपरंपरेमध्ये कवीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. साहजिकच कीर्तनातील स्वररचना आणि तालयोजनासुद्धा साधीच असते जेणेकरून, ती सामान्य गायकांनासुद्धा गाता येईल.

आख्यानात परमार्थ बोध, पदबंधाचे सौंदर्य, कथा, विनोद आणि जगाला शांती देण्याचे सामर्थ्य हे घटक असावेत, असे संतांनी म्हटले आहे. मराठी आख्यानकाव्यातील दुसरा प्रवाह हा कलात्मक किंवा पंडिती कथाकाव्याचा आहे. यात नरेंद्रांचे रुक्मिणी स्वयंवर, भास्करभट्ट बोरीकरांचे शिशुपाल वध, रघुनाथपंडितांचे नलदमयंती स्वयंवराख्यान, साम राजाचे रुक्मिणी हरण, सीता स्वयंवर अशी अनेक आख्यान काव्ये आहेत. अठराव्या शतकापर्यंतच्या परमार्थ प्रमाण वातावरणाची पार्श्वभूमी या काव्यांना असली तरी, त्याचा आशय आणि अभिव्यक्ती प्राधान्याने अधिक काव्यात्मक व कलात्मक घडवण्याचा प्रयत्न संबंधित कवींनी केलेला आपल्याला आढळतो.

रामायण महाभारतातील प्राचीन ग्रंथातील कथांचे आधार या आख्यान काव्यांना असत. तरी संस्कृतातील विदग्ध महाकाव्याचा आदर्श अनुसरण्याचा त्यात प्रयत्न दिसतो. रुक्मिणी हरण हे त्याचे एक उदाहरण म्हटले जाते. आख्याने ही संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या छायेखाली वाढलेली, खंड काव्याची अभिनव रोपटीच म्हणाला हवीत. पंडित अख्यानेही संस्कृतज्ञ रसिकांना उद्देशूनच लिहिली होती. संस्कृत महाकाव्यातील आदर्शवादी भूमिका, त्यातील काव्य संकेत, व्यक्तिचित्रणाची धाटणी, अलंकारिक व कल्पना सुंदर वर्णने, वृत्तरचनेतील विविधता आणि केंद्रीय कथेच्या जडणघडणीचे स्वरूप या सर्वांचा स्वीकार करून, त्यांच्या तोडीची कथात्मरचना या पंडित कवींनी केलेली आहे, असे दिसून येते.

या रचना श्रद्धाळू, सर्वसामान्य लोकांसाठीच लिहिण्यात आल्यात. श्रीकृष्ण-श्रीराम यासारख्या देवता, पांडवांसारखे त्यांचे निष्ठावंत भक्त, संत-महात्मे इत्यादींच्या चरित्र वर्णनांनी किंवा लीला वर्णनांनी ही आख्याने नटलेली आहेत. त्यातील कथा अर्थातच रामायण, महाभारत, भागवत, पुराणे यातील असून त्यांचे आपल्या प्रकृतीनुसार संस्करण करण्याचे स्वातंत्र्य ही आख्यान रचणाऱ्या कवींनी घेतलेले आहे. अशा उद्बोधक आख्यान्यांची शब्दकथा सरळ, साधी शैली, उद्बोधक, चित्तवेधक अशा प्रकारचे असते. भक्तीरसासोबतच शृंगार, करुणा, अद्भुत अशा सर्व नवरसांचा आविष्कारही त्यात आपल्याला आढळतो. वेधक कथा निरूपण हा त्यांचा मुख्य विशेष आहे. त्याच्या अनुषंगाने आणि धार्मिक उद्बोधनाच्या दृष्टीने, साधलेली काव्यात्मकता आणि कलात्मकता आपल्याला आख्यान काव्यामध्ये आढळते.

मंडळी, या पूर्वीच्या भागात कीर्तन परंपरा आणि आज आख्यान काव्य प्रकार यावर थोडं लिहिण्याचा प्रयत्न केलाय. या पुढील भागात कीर्तनाच्या अनुषंगाने येणाऱ्या पदांविषयी आपण बघू या !

रक्षावा धर्म असा करिसी उपदेश तरी असे मान्य,
रक्षितसो धर्मति अम्हा धर्म ठावूका नान्य...

मी नववीच्या वर्गात अभ्यासलेली ही आर्या सहज आठवली. इथे धर्म या शब्दावरील श्लेष केवळ अप्रतिम आहे. या आर्येसह आणि आता इथेच थांबते. भेटू या पुढील शनिवारी!

# 'महाराणी नागनिका'

शुभांगी गान/८६५७४२४०७१

जगातील पहिल्या साम्राज्ञिचा मान मिळवणारी सातवाहन या वंशातील पहिली वीर साम्राज्ञी नागनिका सातकर्णी. जगातील पहिली महाराणी जिच्या नावाचा शिक्का चलनात आला होता. जगातील पहिली महाराणी जिने सनातन वैदिक धर्माचा ध्वज अरब सारख्या दूर देशापर्यंत फडकवला होता. जगातील पहिली महिला शासक जिने वैदिक संस्कृती, यज्ञ परंपरा, सनातन धर्म याचा वारसा जपला होता. जगातील पहिली महिला शासक जिच्या नावाने शत्रूंचा थरकाप उडत असे. आणि जगातील ती पहिली महिला शासक जिने व्यापार सुदूर देशांपर्यंत पोहोचवला होता.

सम्राट अशोका नंतर जवळपास इसवी सन पूर्व २०० ते इसवी सन २५० पर्यंत सातवाहनांचा राज्य होतं. सम्राट अशोकाच्या काळात सेनापती प्रांताधिपती ,अधिपती यांनी मौर्य वंशाचा पतनानंतर स्वतःला त्या त्या विभागाचे राजे म्हणून घोषित केलं. त्यातच सिमुक सातवाहन यांनीही स्वतःच राज्यघोषित केलं आणि हाच राजवंश पुढे ३३ राज्यांपर्यंत चालला. एवढं वैभवशाली साम्राज्य ह्या वंशांनी निर्मित केलं होतं. ह्या वंशातील तिसरी पिढी ही नागनिकेची. महाराणी नागनिका ही शककन्या महारथी शूर सेना पती त्राणकियाची कन्या आणि सम्राट सिमुक सातवाहन यांची पुत्र वधू, तर सिरी सातकर्णी याची पत्नी. ब्राह्मण कुलोत्पन्न क्षत्रिय वृत्ती असलेल्या वीर पुरुषाशी तिचा विवाह झाला आणि तिने आर्य वर्णाची, वैदिक संस्कृतीची, चातुर्वर्णाची, यज्ञ संस्कृतीची मनोभावे सेवा केली. सातकर्णी प्रथम हा अतिशय शूर वीर योद्धा होता. सातवाहनांचा राज्य हे महाराष्ट?, कोकण आणि कर्नाटक या भागात विस्तारलेलं होतं. सिरी सातकर्णी ह्याने संपूर्ण दक्षिण पथ जिंकून घेतला होता. राजसूय आणि अश्वमेध यज्ञ ही केले होते. आणि हीच यज्ञ परंपरा तिने आपल्या संपूर्ण कारकिर्दीत सांभाळलेली होती. पण युवावस्थेतच सातकर्णी प्रथम याचं निधन झालं आणि त्याचे दोन पुत्र वेदश्री आणि सतश्री हे अल्पवयीन असल्यामुळे त्यांना राज सिंहासनावर बसवून राजकारणाचे सूत्रे महाराणी नागनिकेनी सांभाळली होती. तिच्या वेळेस राजधानी पैठण होती. मात्र सिमुक राजांच्या वेळेस ती विदर्भातील पवनी येथे होती.

ज्यावेळेस राणीने राज्यकारभार हाती घेतला त्यावेळेस बेबीलोनिया आणि सीरिया मधून येणारे आक्रमणकारी भारताच्या अनेक भागात टोळधाडी सारखे येत .इथली धनसंपत्ती ,संस्कृती यांचा विनाश करून प्रजेवर अत्याचार करून परत जात.महाराज सातकर्णीच्या मृत्युसमयी राज्य अशाच संकटातून जात होतं पण राणी नागनिका हरली नाही .तिने एक संदेश रवाना केला.'आम्ही शांतता प्रिय असलो ,आम्हाला युद्ध नको असलं तरी देखील आक्रमणाला तोंड देणं आम्ही जाणतो आणि आमच्या राज्यात येऊन आमच्या प्रजेवर केल्या गेलेले अत्याचार आम्ही सहन करणार नाही. एवढंच नव्हे तर तिने स्वतः या आक्रमणकर्त्यांसमोर त्यांच्या विशाल सेनेसमोर एक विरांगना, एक पराक्रमी ,खंबिर स्त्री बनून युद्धभूमीवर उभी राहिली. आपल्या सेनेचं नेतृत्व तिने केलं. आपला पराक्रम ,शौर्य आणि रणनीती याच्या बाहुबळावर अनेकांना तिने कंठस्नान घातलं. अनेक धारातीर्थी पडले तर अनेक पळून गेले .काहींनी शरणागती पत्करली. दुर्गेसारखी एका तेजाने ती आणि तिची सेना तळपली होती.

महाराणी नागनिका एक कुशल राजनीतिज्ञ होती या राजनीतीच्या आधारावरच अनेक विरोधी राज्यांना युद्ध न लढताच एका छत्राखाली तिने आणलं होतं. तिने अनेक यज्ञ केलेत आणि वैदिक धर्माला एक प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. आर्य धर्माचं पुनरुज्जीवन केलं. सीमा संरक्षण ही अतिशय महत्त्वाची गोष्ट तिने जाणली होती आणि त्यानुसार सीमा सुरक्षेला अत्यंत महत्त्वाचं असं स्थान तिने दिलं होतं. राज्य सधन आणि संपूर्ण होण्यासाठी व्यापार हे महत्त्वाचं साधन आहे हे जाणून तिने व्यापाराला आपल्या राज्यात महत्त्वाचं स्थान दिलं होतं. तिच्या शासन काळात रोम ,इराण, इजिप्त या देशांशी व्यापार वाढलेला होता या व्यापारासाठी तिने अनेक परिवहन मार्ग समृद्ध केले. महाराष्ट?ातील कल्याण, सोपारा, भडोज बंदरातून उत्तर प्रदेशाकडे प्रतिष्ठान पैठण मार्गे व्यापार चालत असे. त्यामुळे प्रतिष्ठानची अतिशय भव्य अशी व्यापार पेठ होती.

एक कुशल राज्य नितीज्ञ याबरोबर सनातन हिंदू धर्माची ती संरक्षक होती .एक विलक्षण रण कौशल तिच्यात होतं. असं म्हटल्या जातं की ती ४९ युद्ध कला मध्ये ते निपुण होती. शत्रूचा अहंकार ती आपल्या बळावर संपवत असे आणि तरीही एखादा तिला जुमानत नसेल तर त्याची राज्य नष्ट करून त्याला संपवण्यासाठी ती सक्षम होती. निरारी पंचम ह्या आक्रांताने आपल्या विशाल सेनेसहित हमला केला तेव्हा राणीने त्याला प्रचंड मात देत त्यांना असा धडा दिला की तिच्या मृत्यूनंतरही परकीय आक्रमणकर्त्यांची परत आक्रमण करण्याची हिम्मत झाली नाही. असं म्हटल्या जातं की १५७ आक्रमणकर्त्यांनी तिच्या पराक्रमासमोर गुडघे टेकले होते.

जुन्नर जिल्ह्यातील नाणेघाट येथे एक ऐतिहासिक शिलालेख आहे त्यात तिचा शासन काल तिचा साम्राज्यविस्तार सातवाहन वंशाची उत्पत्ती सिमुक सातवाहन, सातवाहन वंशाचे संस्थापक यांच्या विषयी, याशिवाय प्राकृत, वैदिक धर्माचे अनुष्ठान, देवी देवतांचे अधिष्ठान, ब्राह्मी लिपीत लिहिल्या गेलेला हा शिला लेख तिच्या संपूर्ण कारकीर्दीवर प्रकाश टाकतो. राजसूय यज्ञ आणि अश्वमेध यज्ञ तिने सुद्धा केले होते असं त्या शिलालेखावरून कळतं. एकंदर सनातन आणि वैदिक धर्माचं पुनरूज्जीवन करणारी ती एक महान राणी होती.



जुन्नर जिल्ह्यातील नाणेघाट येथे एक ऐतिहासिक शिलालेख आहे त्यात तिचा शासन काल तिचा साम्राज्यविस्तार सातवाहन वंशाची उत्पत्ती सिमुक सातवाहन, सातवाहन वंशाचे संस्थापक यांच्या विषयी, याशिवाय प्राकृत, वैदिक धर्माचे अनुष्ठान, देवी देवतांचे अधिष्ठान, ब्राह्मी लिपीत लिहिल्या गेलेला हा शिला लेख तिच्या संपूर्ण कारकीर्दीवर प्रकाश टाकतो.

॥ उसंतवाणी ॥

१४८४

आज जागतिक । वारसा दिवस ।
संस्कृती सकस । सांगणारा ॥१॥

माणसाने किती । प्रतिभा लावूनी ।
दिल्या उभारूनी । वास्तू ऐश्या ॥२॥


अप्रतिम शिल्पे । कोरीव ती नक्षी ।
पान फूल पक्षी । दगडांत ॥३॥

देखण्या त्या वास्तू । काय ती भव्यता ।
येई ना मोजता । सामान्यांना ॥४॥

काय त्या कल्पना । सौंदर्याची दृष्टी ।
प्रतिभेने सृष्टी । निर्मिली ही ॥५॥

अभिमाने येतो । भरूनिया ऊर ।
कौतुकाचा पूर । डोळ्यांमध्ये ॥६॥

कांत जागतिक । संपन्न वारसा ।
जपण्याचा वसा । घेऊ चला ॥७॥



जागतिक वारसा दिन
18 एप्रिल

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
१८ एप्रिल २०२५

## शनिवारी 'कथा घेरा' या कथा-अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ : मराठवाडा आर्ट कल्चर आणि फिल्म फाऊंडेशन, एमजीएम पत्रकारिता महाविद्यालय आणि एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने मासिक अभिवाचन उपक्रमांतर्गत 'कथा घेरा' या कथा-अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता व्ही. शांताराम प्रेक्षागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

या कार्यक्रमात सुप्रसिद्ध कथाकार श्री. बालाजी सुतार हे त्यांच्या 'फरसाण, फ्रॉईड आणि किरकोळ वार्डातल्या गोष्टी' आणि 'उत्तरार्ध - पांडुरंग सांगवीकरचं पुढे काय झालं...' या दोन रंजक कथांचे अभिवाचन करतील. या कथांद्वारे दैनंदिन जीवनातील वास्तव अनुभवता येईल.

अभिवाचन-प्रकारच्या सादरीकरणातून कथा श्रोत्यांपर्यंत पोहचवणे, सांस्कृतिक वारसा जागवणे आणि नवीन पिढीला या कथासाहित्याशी जोडणे, सामाजिक संवाद वाढवून मनोरंजनासह विचार मंथनाला चालना देणे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश आहेत.

१८ वर्षांवरील सर्वांना या अभिवाचन कार्यक्रमात विनाशुल्क प्रवेश आहे. जास्तीत जास्त रसिकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारतात सेमीकंडक्टर वाढीला गती दिली

मुंबई- ॲक्सिरो सेमीकंडक्टर प्रा. लि.ने आज व्हाइटफिल्ड, बेंगळुरू येथे त्यांच्या अत्याधुनिक फॅबलेस सेमीकंडक्टर डिझाइन सेंटरच्या भव्य उद्घाटनाची घोषणा केली. एरिकसन, नोकिया, ह्युजेस् आणि सिमेन्स यांसारख्या जागतिक प्रमुख कंपन्यांना दर महिन्याला लाखो आयसींचे शिपिंग करण्यासह भारतात कार्यरत असलेली पहिली फॅबलेस सेमीकंडक्टर कंपनी ॲक्सिरो ५जी/६जी, स्ट्रॅटेजिक डिफेन्स, सॅटेलाइट कम्युनिकेशन्स आणि औद्योगिक आयओटी अशा उच्च प्रभावी क्षेत्रांमध्ये नाविन्यतेला चालना देण्यास सज्ज आहे.

## ७,५०० कोटी रुपयांच्या निधी संकलनाला मान्यता दिली

मुंबई: आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत जागतिक वाढीच्या गुंतवणूकदार वॉरबर्ग पिंकस एलएलसीची संलग्न कंपनी करंट सी इन्व्हेस्टमेंट्स बी.व्ही. ला अंदाजे रु.४,८७६ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) आणि अबू धाबी इन्व्हेस्टमेंट अथॉरिटी (एडीआयए) ची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या प्लॅटिनम इन्व्हिक्टस बी २०२५ आरएससी लिमिटेडला अंदाजे रु.२,६२४ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) ला मान्यता दिली. प्रस्तावित इश्यूज शेअरहोल्डर आणि नियामक मंजुरींच्या अधीन आहेत.

## मोटोरोलाकडून एज ६० स्टायलस सादर

मुंबई : मोबाईल तंत्रज्ञान आणि नवकल्पनेत जागतिक आघाडीवर असलेल्या, तसेच भारतातील आघाडीचा एआय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या मोटोरोलाने आज आपल्या बहुप्रतिक्षित ऐज ६० सीरिजमधील मोटोरोला एज ६० स्टायलस हा सर्वात क्रिएटिव्ह आणि एआय-सक्षम स्मार्टफोन लाँच केला आहे. सेगमेंटमधील पहिल्यांदाच बिल्ट-इन स्टायलससह येणारा हा स्मार्टफोन क्रिएटर्स, मल्टिटास्कर्स आणि विचारवंतांसाठी खास डिझाइन करण्यात आला आहे - ज्यांच्यासाठी अचूकता, नियंत्रण आणि मोबाईलवरील कार्यक्षमता महत्त्वाची असते. साध्या स्केचिंगपासून ते एआय स्केच टू इमेज आणि हस्ताक्षर ते मजकूर रूपांतरणासारख्या प्रगत एआय टूल्सपर्यंत, ऐज ६० स्टाइलसअभिव्यक्ती आणि कार्यक्षमतेचा एक नवा आयाम उघडतो.

## ३डी प्रिंटेड संरचना बनवून एक नवीन ग्लोबल बेंचमार्क

मुंबई: डिफेंस इन्फ्रास्ट्रक्चर आणि निर्माण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक ऐतिहासिक उडी घेत, सिंप्लिफोर्ज क्रिएशन्स आणि आयआयटी हैदराबाद यांनी समुद्रसपाटीपासून ११,००० फूट उंचीवर लेहमध्ये भारताची पहिली ऑन-साइट ३डी प्रिंटेड सुरक्षात्मक मिलिट्री संरचना यशस्वीरित्या निर्माण केली आहे. भारतीय सेनेच्या सहकार्याने, प्रकल्प 'प्रबल' अंतर्गत हे निर्माण करण्यात आले आहे. ही उपलब्धी जगातील सर्वाधिक उंचीवर इन-सिटू ३ऊ कन्स्ट्रक्शन प्रिंटिंगची नोंद करणारी घटना ठरली आहे. हे अत्यंत उंची आणि कमी ऑक्सिजन असलेल्या परिस्थितीत पूर्ण करण्यात आले आहे. आयआयटी हैदराबादचे प्राध्यापक के. व्ही. एल. सुब्रमण्यम यांच्या नेतृत्वाखाली, सिंप्लिफोर्ज क्रिएशन्स आणि आयआयटी-हैदराबादच्या टीम्सने अशी ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञान विकसित केली आहे जी अत्यंत आव्हानात्मक परिस्थितींमध्ये काम करू शकेल. या नाविन्यामुळे स्थानिकपणे उपलब्ध असलेल्या सामग्रीचा वापर करून एक फॉर्म-ऑप्टिमाइझ्ड सुरक्षात्मक बंकर तयार करणे शक्य झाले आहे. हे सर्व एकूण चौदा तासांच्या प्रिंटिंग कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील हरित ऊर्जा परिवर्तनाची गती वाढवली

महाराष्ट्र १८ एप्रिल, २०२५: सार्वजनिक पायाभूत सोयीसुविधांना सौर ऊर्जा सक्षम बनवण्याच्या महाराष्ट्र राज्य सरकारच्या उपक्रमाच्या समर्थनार्थ, टाटा पॉवरने राज्यभरात २३० पेक्षा जास्त सार्वजनिक संस्थांना यशस्वीपणे सौर ऊर्जा सक्षम बनवले आहे. हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलून टाटा पॉवरने एकूण जवळपास १०७ मेगावॅट शुद्ध ऊर्जा क्षमतेचे योगदान दिले आहे. सौर ऊर्जा सक्षम संस्थांमध्ये प्रमुख जिल्ह्यांमधील १०० रुग्णालये (३.६ मेगावॅट), ६४ शाळा (२ मेगावॅट) आणि ७२ सरकारी व इन्स्टिट्यूशनल इमारतींचा (१०० मेगावॅट) समावेश आहे. टाटा पॉवरची ही सर्व इन्स्टॉलेशन्स एकूण १.३ लाख टन कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन रोखत आहेत, ज्यामुळे होणारा प्रभाव २० लाख झाडे लावण्याइतका आहे.

## स्कोडा ने ऑल-न्यू स्कोडा कोडियक कार केली लाँच

छत्रपती संभाजीनगर येथील प्लांटमध्ये असेम्बल करण्यात आलेल्या कोडियकला एआरएआय कडून १४.८६ किमी/लिटर इंधन कार्यक्षमता देण्यासाठी प्रमाणित करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर , १८ एप्रिल २०२५ : स्कोडा कायलॅक श्रेणीच्या यशस्वी लाँचनंतर स्कोडा ऑटो इंडिया आता त्यांची लक्झरी ४४ एसयूव्ही कोडियकच्या ऑल-न्यू जनरेशनच्या लाँचसह स्पेक्ट्रकच्या दुसऱ्या बाजूस नवीन कारची घोषणा करत आहे. भारतात व जगभरात सेकंड जनरेशन असलेली नवीन कोडियक लक्झरी, सुधारणा, ऑफ-रोड क्षमता, ऑन-रोड गतीशीलता आणि सात-आसनी विविधतेच्या सिग्नेचर संयोजनासह भारतामध्ये लाँच करण्यात आली आहे.

# मनुष्यबळ विकास हा नव्या जगातील शाश्वत विकासाचा मंत्र : धारूरकर

### आयएसटीडी संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

नव्या जगामध्ये मनुष्यबळ विकास हा शाश्वत विकासाचा मंत्र आहे. महर्षी व्यास यांनी महाभारतामध्ये असे म्हटले होते की, जगात माणसासारखे अन्य काहीही महत्त्वाचे नाही. सर्वात प्राधान्याने माणसाचा विचार केला पाहिजे. यावरून आपणास राष्ट्र उभारणीत मनुष्यबळ विकासाचे महत्त्व लक्षात येते, असे मत प्रसिद्ध विचारवंत आणि माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांनी गुरुवारी, १७ रोजी येथे व्यक्त केले.



डॉ. हेडगेवार रुग्णालय परिसरातील दामू अण्णा दाते सभागृहात इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट म्हणजे आयएसटीडी संस्थेच्या ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. धारूरकर म्हणाले, आयएसटीडी या संस्थेने देशांमध्ये प्रशिक्षण संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या तीन दशकात छत्रपती संभाजीनगर सह खानदेश आणि अहिल्यानगर तसेच मराठवाडा विभागातील एक शिखर संस्था म्हणून आयएसटीडीने महत्त्वाचे कार्य केले आहे. दिवसभर चाललेल्या चर्चासत्रामध्ये प्रामुख्याने प्रशिक्षण कार्य, संस्कृती, मनुष्यबळाचा विकास तसेच प्रशिक्षणातील गुणवत्ता इत्यादी सत्रांमध्ये विविध शोधनिबंध सादर करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. जयप्रकाश बागडे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात माजी अध्यक्ष डॉ. रंजन गर्गे यांना उत्कृष्ट कार्यासाठी आयएसटीडी पुरस्कार महेश देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विविध चर्चासत्रांमध्ये सीए संजीव बजाज, सुधीर कोर्टीकर, सतीश वानखेडे, गोपाळ सोनार, डॉ. रंजना देशमुख, सुरेश साकला, कॅप्टन डॉ. श्रेयस आहेर यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमलता बागडे व अनुजा खडके यांनी, तर अशोक गुरनाळे यांनी आभार मानले. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तेरा वर्षीय मुलाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

### तेलवाडी गावावर शोककळा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१८ एप्रिल - तालुक्यातील तेलवाडी येथील तेरा वर्षीय मुलाचा पाण्यात बुडून दुर्दैवी अंत झाल्याची घटना दि.१८ रोजी दुपारी घडली आहे



राहुल विलास चव्हाण वय १३ वर्ष रा.तेलवाडी हा आपल्या मित्रांसोबत अंबाडी मध्यम प्रकल्पात पोहण्यासाठी गेला होता,पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला त्यास काही बिहारी मजुरांनी पाण्यातून बाहेर काढले आणि कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ.पटेल यांनी त्यास तपासून मयत घोषित केले,

राहुल हा तेलवाडी येथील आश्रम शाळेत शिक्षण घेत होता उन्हाळी सुट्या लागल्याने तो घरीच आई वडिलांकडे राहत होता त्याचे आई वडील हे मोलमजुरी करतात नेहमी प्रमाणे ते मजुरी करण्यासाठी गेले होते त्याच वेळी राहुल आपल्या मित्रांसोबत पोहायला गेला होता,दुपारी कन्नड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांना सुपुर्द करण्यात आला सायंकाळी अंत्यत शोकाकुल वातावरणात तेलवाडी गावात अंत्यसंस्कार झाले त्याच्या पश्चात आई,वडील,भाऊ असा परिवार आहे .

# रेल येथे भैरवनाथ महाराज यात्रेनिमित्त हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.१८ एप्रिल - तालुक्यातील रेल येथे हनुमान जयंती व श्री भैरवनाथ महाराज यात्रेनिमित्त अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

गोपालनंद गिरी महाराज सुवर्ण पालेश्वर, बालचंद्रगिरी महाराज व ह.भ.प.अशोक महाराज मुंडवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली १२ एप्रिल हनुमान जयंती पासून सुरूवात झाली आहे. यामध्ये सकाळी ४ते६ काकडा भजन, ७ ते११ वाजता ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ते ५ वाजेदरम्यान भावार्थ रामायण, ६ते७ वाजता हरीपाठ व सायंकाळी ९ते११ वाजता हरी किर्तन व जागर होत आहे. या निमित्ताने राज्यभरातील नामवंत किर्तनकार महाराजांची किर्तन सेवा होत आहे. माधव महाराज पाडसवान, बाळू अण्णा महाराज थेटे,उत्तम मोरे व भाऊसाहेब थेटे हे ज्ञानेश्वरी पारायणाचे व्यासपीठावरून वाचन करत आहेत. तर रामकृष्ण महाराज घुले प्रवचन सेवा देत आहे. शनीवार १९ एप्रिल रोजी ह.भ.प. सोपानदादा महाराज कनेकर यांच्या काल्याचे किर्तन व महाप्रसादाने या हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता होणार आहे. तर २१ एप्रिल सोमवार रोजी श्रीभैरवनाथ महाराज यात्रेच्या दिवशी बारागाड्या ओढण्याचा व जागरणाचा कार्यक्रम होणार आहे. या दिवशी भागीनाथ सावंत व बाळू बोडखे जागरण सेवा देणार आहे. या सप्ताह निमित्त अन्नदान व विविध सेवा सुविधा या ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

### वडनेर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

कन्नड : तालुक्यातील वडनेर येथील विठ्ठल मुक्तिधाम मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार २५ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. इंद्रायणी मोरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे आणि त्या नंतर महाप्रसाद (भंडारा) संपन्न होईल.

वडनेर आणि वडनेर पंचक्रोशीसह तालुक्यातील भाविक भक्तांनी व सनातन धर्मप्रेमींनी या धार्मिक उत्सवात सहभागी होऊन या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी वडनेर यांनी केले असल्याची माहिती सेवानिवृत्ती पोलिस उपनिरीक्षक नामदेव चव्हाण यांनी दिली आहे.

# विघ्नहर्ता गणेश मंदिराचा मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

### हभप रामगिरी महाराजांच्या किर्तनाला भाविकांचा उदंड प्रतिसाद

तभा वृतसेवा

गंगापूर दि.१७: गंगापूर शहरात नव्याने बांधण्यात आलेल्या श्री विघ्नहर्ता गणेश मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा १३ ते १६ एप्रिल २०२५ दरम्यान अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला आहे. या चार दिवसांच्या कार्यक्रमात विविध धार्मिक विधी, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते प्राणप्रतिष्ठा सोहळा १६ एप्रिल २०२५ (संकष्टी चतुर्थी) संपन्न झाला, या दिवशी सायंकाळी ६:३० वाजता निमित्त ह.भ.प. महंत रामगिरी महाराज गोवर्धन (सरला बेट) यांचे जाहिर कीर्तन झाले.





त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला .या संपूर्ण आयोजनात आमदार प्रशांत बंब यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.आमदार बोंब यांनी २० लक्ष रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे.

यावेळी नगरसेवक लक्ष्मणसिंग राजपूत प्रदीप पाटील अविनाशपाटील विजय पानकडे भाग्येश गंगवाल डॉक्टर आबासाहेब सिरसाठ श्रीराम नावंदर करण खोमणे करण राजपूत रमेश भुसारे नितीन मंदिराचे पुजारीउमेश गुरु जोशी विष्णुपंत दादा पोळ संजय रोकडे मदनसिंग राजपूत सचिन भवार बारकू भाऊ राजपूत बाबूलाल राजपूत सुखलाल राजपूत केतन आरसूल गोकुळ राजपूत

विघ्नहर्ता गणेश मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेंदूर टोप मिरवणुकीने श्री. म्हसोबा महाराज यात्रा महोत्सवाला उत्साहात सुरुवात

सिल्लोड* ( प्रतिनिधी ) दि.१८, पारंपरिक पद्धतीने शेंदूर , टोपच्या भव्य मिरवणुकीने सिल्लोडचे आराध्य दैवत श्री. म्हसोबा महाराज यात्रेला उत्साहात सुरुवात झाली. टोप व शेंदूर मिरवणुकीनंतर दुपारी १२ वाजता विधिवत पूजेने श्रीं चा भव्य अभिषेक सोहळा पार पडला. याप्रसंगी आ. अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी यात्रा उत्सव समितीचे प्रमुख मार्गदर्शक आ. अब्दुल सत्तार यांचा श्री. म्हसोबा महाराज संस्थान तसेच यात्रा उत्सव समितीच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. आ. अब्दुल सत्तार यांनी भाविकांशी संवाद साधून श्री. म्हसोबा महाराज यात्रा उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी तहसीलदार संजय भोसले, प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक माधव मयंक, यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष नंदकिशोर सहारे, पोलीस निरीक्षक शेषराव उदार, राजेंद्र बन्सोड, प्रताप प्रसाद, संतोष ठाकूर, विठ्ठल सपकाळ, पांडुरंग डवणे, सुनील प्रशाद ,मनोज झंवर, शंकरराव खांडवे, शकुंतलाबाई बन्सोड, सुधाकर पाटील, प्रशांत क्षीरसागर, सुनील दुधे, मंजितराव भाग्यवंत, राजू गौर, विशाल जाधव, बाबुराव वाकडे, अशोक बन्सोड, राजेंद्र ठोंबरे, मनोज कोठाळे, संजय मुरकुटे, मनोज महाराज भाग्यवंत, योगेश जोशी, लखन ठाकूर, दीपक वाघ, शिवा टोम्पे, फहिम पठाण, अमृतलाल पटेल, प्रकाश कोठाळे, गणेश कोठाळे, रामदास वाघ, दिलीप वाघ, कृष्णा वाघ, भावराव दुधे, जगन्नाथ कुदळ, चंद्रकांत इंगे, कैलास इंगे, नारायण इंगे, कुणाल सहारे, रामेश्वर कुदळ, संतोष आगे, गौरव सहारे, अजय वाघ, रामप्रसाद तसेवाल, ईश्वर मुरकुटे, गजानन सोनवणे आदिंसह भविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सिल्लोड नगर परिषदेकडून यात्रा परिसरात भाविकांना नवसपूर्तीसाठी तसेच ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासोबतच खबरदारीचा उपाय म्हणून यात्रा परिसरात अग्निशमन दलाचे बंब, रुग्णवाहिका ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच भाविकांना विश्रांतीसाठी स्वागतकक्ष, यात्रा परिसरात प्रखर विद्युत रोषणाई आदी सोयीसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. यात्रा उत्सव शांततेत व उत्साहात साजरी करण्यासाठी यात्रा उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य परिश्रम घेत आहेत.

यात्रेनिमित्त गुरुवार रोजी रात्रीपासूनच भाविकांनी दर्शन, अभिषेक व नवसपूर्ती साठी गर्दी केली होती. दुपारी ०४ वाजता विधिवत पूजा व अभिषेक नंतर बारागाड्या कार्यक्रमाला सुरवात झाली. तगतराव, फटाक्यांची आतिषबाजी, दशावतारी सोंगे अशा प्रकारचे विविध पारंपरिक कार्यक्रम दिवसभर सुरू होते.

यात्रेनिमित्त यात्रा परिसरात विद्युत रोषणाई, पताके , रहाटपाळणे, प्रसाद व विविध प्रकारची दुकाने थाटली असून भविकभक्तांच्या अलोट गर्दी व श्री. म्हसोबा महाराज यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला आहे.

### संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९४) प्रकल्प

देशात २७६ वनवासी जिल्हे आहेत व एक लाख तीस हजार वनवासी गावे आहेत. आज देशभरात ५000 स्थानी ८000 वनवासी कल्याण प्रकल्प आहेत. वीस हजार वनवासी गावांशी संघ कार्यकर्त्यांचा संपर्क आहे. संघाचे स्वयंसेवक भिन्नभिन्न क्षेत्रात गेले व त्यांनी समाज परिवर्तनाची एक एक क्षेत्रे उभी केली ही संघाला अपेक्षित समाज परिवर्तनाची सहज प्रक्रिया आहे. उदाहरणार्थ राजस्थानात उदयपूर झालावाड आदी ठिकाणी अनाज बँक- रक्त बँक औषध बँक खास वनवासींसाठी आहेत. महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यातील तलासरी, तसेच पालघर मोखडा आदि ठिकाणी, शिलाई इलेक्ट्रिशियनचे शिक्षण देण्यात येते. उत्तर प्रदेशात गढवाल येथे, पश्चिम बंगालमध्ये पुसालिया, मिदनापूर येथे, तसेच लद्दाख मध्ये धर्मांतरीत वनवासींची पुनश्च हिंदू धर्मात वापसी केली जाते १९६६ ला पश्चिमे ओडीसा दुष्काळ पडला होता तेव्हा विपदा निवारणात प्रत्यक्ष वनवासीच युवकांनी सहयोग नोंदवला होता ३५00 गावातील ३५ हजार लोकांना अन्न वितरित केले होते. हजारो पशुंना चारा दिला होता. शेकडो विहिरी खोदल्या होत्या. ज्येष्ठ समाज कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांनी भटके विमुक्तांसाठी यमगरवाडी सेवा प्रकल्पाचा पाया ऑगस्ट १९९३ साली रचला होता हा व असे अनेक प्रकल्प आज कृतीतून सिद्ध झाले आहेत.

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

### एमजीएममध्ये 'लर्न दि आर्ट ऑफ व्हाईस' विषयवार कार्यशाळेचे आयोजन

# आवाजाच्या जोरावर घडवा यशस्वी करिअर!

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचे कॉलेज ऑफ कॅम्युनिकेशन, कल्चर आणि मिडियाच्या वतीने सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ ते मंगळवार, दिनांक २२ एप्रिल २०२५ असे दोन दिवस 'लर्न दि आर्ट ऑफ व्हाईस' विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सुप्रसिद्ध व्हॉईस आर्टिस्ट, कवी अक्षय शिंपी हे मार्गदर्शन करणार आहेत.

आवाजाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणे तसेच त्याद्वारे रेडिओ, पॉडकास्टिंग, जाहिरात, स्टोरीटेलिंग आणि पब्लिक स्पीकिंगसारख्या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना करिअर घडवण्यासाठी मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे. कार्यशाळेचा वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत असणार आहे.

या कार्यशाळेसाठी सर्वांना खुला प्रवेश असणार असून विद्यार्थ्यांसह, कंटेंट क्रिएटर्स, शिक्षक, निवेदक, न्यूज अँकर आणि सर्व संबंधितांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी करण्यासाठी https://journalism.mgmu.ac.in/ या संकेतस्थळास भेट देऊन नाव नोंदवता येईल अथवा प्रत्यक्षपणे महाविद्यालयास भेट देऊन नोंदणी करता येणार आहे.

## सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न



अजिंठा १७ एप्रिल - दिनांक ०९ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नित सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालय अजिंठा ता.सिल्लोड जि.छत्रपती संभाजी नगर येथील महाविद्यालयामध्ये पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बीए बीएससी तृतीय वर्षाचे पदवीचे शिक्षण पूर्ण झालेले अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या पदवी वितरण सोहळ्याला हजर होते .या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री .एस व्ही भोंबे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड येथील उपप्राचार्य प्रा.डॉ.जी .एन .मोरे सर होते. यावेळी प्राध्यापक मोकळे सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. आणि कॉलेजचे प्राचार्य प्राध्यापक एस .एस .पांडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून पदवी वितरण सोहळा हा कॉलेज स्तरावर घेण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्याचप्रमाणे प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे आणि पदवी प्रमाणपत्राचे आपल्या जीवनामध्ये किती महत्त्व आहे हे समजावून सांगितली. यावेळी कार्यक्रमाचे आभार मानण्याचे काम प्रा.दिवटे सर यांनी केले .श्री. राकडे सर आणि श्री. विजय पवार आदी कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयातील बीएससीचे शिक्षण पूर्ण झालेल्या २५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले . त्याचप्रमाणे बी. ए. च्या १५ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

## शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं बुंगा फाईट सर्वत्र धुमाकूळ घालतंय

छत्रपती संभाजीनगर - मराठी गाण्यांनी सध्या सोशल मीडियावर एक चांगला ट्रेंड सेट केलाय. सर्वत्र मराठी गाणी वाजताय आणि गाजताय सुद्धा. अशातच आणखी एका मराठी गाण्याने सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातलाय. शशिकांत धोत्रे दिग्दर्शित सजना चित्रपटाचं धमाल गाणं बुंगा फाईट हे मराठी गाणंही आता रसिकांच्या पसंतीस उतरतंय. त्यामुळे सोशल मीडियावर सध्या याच गाण्याची चर्चा सुरु आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १७-०४-२०२५

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **बिराजी प्रेमचंद गायकवाड** यांनी मोहल्ला **वार्ड क्र. १७** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. **१३८४** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : शे. आरीफ शेख युसूफ पश्चिम : रस्ता**
**दक्षिण : बिराजी प्रेमचंद गायकवाड उत्तर : फारुख हानीफ कुरेशी**
आकार : पूर्व पश्चिम **२०×४०= ८००** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १७-०४-२०२५

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **अल्काबाई विजय अस्वार** यांनी मोहल्ला **दयाळनगर** सोयगांव स.नं. ----- मधील घर क्र. **१३३१** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : प्रभाकर दयाळराव काळे यांची जागा पश्चिम : रस्ता**
**दक्षिण : उषा खोरडकर उत्तर : गजानन रघुनाथ हाडे**
आकार : पूर्व पश्चिम **९७९.१६** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

# अंबाजोगाई तालुक्यात महिला वकिलाला अमानुष मारहाण



## समाजमाध्यमांवर प्रचंड संताप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१८ एप्रिल**

अंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे ३६ वर्षीय महिला वकिलाला शेतामध्ये रिंगण करून अमानुष मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गावातील १० ते १२ जणांनी हे कृत्य केले असल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

या बाबत मिळालेल्या माहितीनुसार ज्ञानेश्वरी श्रीधर अंजान या महिला वकिलाने गावातील ध्वनिप्रदूषणाची तक्रार केली होती. याचा राग आल्याने गावातील सरपंच आणि इतर व्यक्तींनी ज्ञानेश्वरी यांना मारहाण केली आहे. आता या महिलेचे मारहाण केलेले फोटो समाजमाध्यमावर व्हायरल झाले आहेत. यामुळे संताप आणि चीड व्यक्त केली जात आहे.ज्ञानेश्वरी या अंबाजोगाई जिल्हा सत्र न्यायालयात वकिलीचा व्यवसाय करतात. दरम्यान, यातील आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती मिळाली आहे.

# उन्हाचा पारा ४० अंशांवर, नागरिकांनी काळजी घ्यावी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ एप्रिल**

एप्रिल महिन्याच्या सुरवातीला सूर्य आग ओकत आहे. शहरातील तापमान ४० अंशांवर गेल्याने वातावरण चांगलेच तापत असून, वाढलेल्या या उष्णतेत थंडाव्यासाठी बाजारपेठांमध्ये एसी, कूलर, फॅन अशा शीतकरण साधनांच्या विक्रीत लक्षणीय वाढ झाली आहे. इतर साधनांपेक्षा एसी महाग असला, तरी नागरिकांना आता ईएमआयसारखे पर्याय उपलब्ध असल्याने मध्यमवर्गीयांकडून सुद्धा एसी खरेदीकडे कल वाढल्याचे व्यावसायिक सांगतात.



थंडावा देणाऱ्या या उपकरणांची उन्हाळ्यात मागणी वाढत असल्याने इतर दिवसांच्या तुलनेत या दिवसांत किमती वाढलेल्या असतात. परंतु, सध्या एसी, कूलर, फॅन आणि फ्रीज यांसारख्या थंडावा देणाऱ्या उपकरणांच्या किमतीत मागीलवर्षीच्या तुलनेत चांगलीच वाढ झाली आहे. यामध्ये कूलर चार हजारपासून ते दहा हजारपर्यंत उपलब्ध आहेत, तर एसी हे ३० हजारांपासून ते ५० हजारांपर्यंत उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे या दिवसांत फ्रीजची मागणीदेखील वाढत असते, तर १० हजारांपासून ४० हजारांपर्यंत फ्रीजच्या किमती आहेत.दिवसाच्या मध्यभागी, म्हणजे दुपारी १२ ते तीन या वेळेत रस्त्यावर फिरणे म्हणजे अंगाची लाही लाही करणारा अनुभव येत आहे. यामुळे नागरिक थंडाव्याच्या शोधात विविध पर्यायांचा विचार करत आहे. सध्या बाजारात आधुनिक व आकर्षक डिझाइन्समध्ये येणारे स्मार्ट कूलर आणि एसी यांसारखी उपकरणे नागरिकांना भुरळ घालत आहेत. सौरऊर्जेवर चालणारे सोलार फॅन, मिनी कूलर यांचीही मागणी वाढत असून, गरम हवामानातही वीज बचतीचा पर्याय म्हणून त्यांची निवड होत आहे. सर्वात जास्त पसंती एसीला मिळत आहे. किंमत जास्त असली, तरीदेखील विविध ऑफर आणि ईएमआयवर सहज उपलब्ध होत असल्याने मध्यमवर्गीयांकडूनदेखील मागणी वाढत आहे. एसीची ६६ यंदा लवकर उकाडा जाणवायला लागला आहे. परिणामी ग्राहक एसी, कूलर, फॅनसाठी खरेदी करण्यासाठी गर्दी करत आहेत. मागीलवर्षीपेक्षा काही प्रमाणात किमती वाढल्या आहेत.

# पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचा सत्कार

## आंबेडकर जयंतीला दिला चोख पोलिस बंदोबस्त

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ एप्रिल**

शहरामध्ये नुकत्याच पार पडलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमीत्त चोख पोलिब बंदोबस्त देत शोभा यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल माजलगाववासीयांच्या वतीने पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचा बाजार समितीमध्ये उपसभापती श्रीहरी नाना मोर यांनी यथोचित सत्कार केला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शहरासह तालुका परिसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमीत्त शहरात शोभायात्रा तसेच विवीध



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात होते. या कार्यक्रमांना कुठेही गालबोट लागु नये तसेच शोभायात्रा शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाने परिश्रम घेत पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांचे मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त देत कुठेही गालबोट अथवा काही वाद - विवाद होउ दिला नाही. त्यामुळे पोलिस प्रशासनाचे कौतुक करत राहुल सुर्यतळ यांचा माजलगाव वासीयांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, नवनाथ धाईजे, प्रदिप जिजा पट्टेकर, राजेश साळवे, भिमराव टाकणखार, टी. आर. जावळे, शेख बाबा, विजय साळवे, रवि सोनवणे, किशोर सातपुते, अमोल गायकवाड, शेख फेरोज, प्रविण ओव्हाळ, लाला शिंदे यांची उपस्थिती होती.

# धनादेश न वटल्याने न्यायालयाने आरोपीस दिली एक वर्ष कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ एप्रिल**

घरगुती अडचणींचे निवारणाकरिता ६ लाख रुपये हातउसने घेतले होते. सदरील ६ लाख रुपयाची फिर्यादीने मागणी केली असता आरोपीने ६ लाख रुपयाचा धनादेश दिला व तो बँकेत वटला जाईल याची शाश्वती दिली परंतू सदरील धनादेश पुरेशी रक्कम नसल्याने वटला न गेल्याने तो परत आला यानंतर फिर्यादीने आरोपीच्या विरोधात बीड येथील मा.सहावे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली होती यावर दि.०८.०४.२०२५ रोजी न्यायालयाने आरोपीस दिली एक वर्ष कारावासाची शिक्षा व धनादेशावरील रक्कम व सदरील रक्कमेवर तक्रार दाखल केल्यापासून ६% व्याज देण्याचा आदेश पारित केला आहे.

याबाबत माहिती अशी की, शहरातील कविता विष्णु देशमाने यांनी पार्वती मारुती साळवे यांच्याकडून ६ लाख रुपये घरगुती अडचणी निवारणाकरिता घेतले होते. पुढे पार्वती साळवे यांनी दिलेले पैसे परत मागितले असता कविता देशमाने यांनी ६ लाख रुपयांचा धनादेश दिला. सदरील धनादेश पार्वती साळवे यांनी स्वतःचे खाते असलेल्या स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे वटविण्याकरिता टाकला असता तो फंण्ड इन सफिशिअण्ट या शेर्याने परत आला. या नंतर कविता देशमाने यांच्या विरोधात पार्वती साळवे यांनी अॅड.ए.जे.सुतार आणि अॅड.वंदना वाघमारे(साळवे)यांच्या मार्फत मा.सहावे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात तक्रार दाखल केली त्यानंतर दि.०८ एप्रिल २०२५ रोजी अंतीम सुनवाई होवून आरोपी यांना १ वर्ष कारावासाची शिक्षा व ६ लाख रुपये तसेच सदरील रक्कमेवर तक्रार दाखल केल्यापासून ६% व्याज देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे.

यावेळी फिर्यादीच्या बाजूने अॅड.ए.जे.सुतार आणि अॅड.वंदना वाघमारे (साळवे)यांनी काम पाहिले त्यांना अॅड.सरपते, अॅड.सोळंके, अॅड.फारुक, अॅड.सायली सुतार यांचे सहकार्य लाभले.

# खरीप हंगाम २०२५ जिल्हास्तरीय कार्यशाळा प्रशिक्षण वर्ग बीड येथे संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ एप्रिल**

खरीप हंगाम २०२५ची पूर्वतयारी व नियोजनाकरिता जिल्हा अंतर्गत कृषी विभागातील सर्व अधिकार व कर्मचारी यांची एकदिवसीय कार्यशाळा बुधवार दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी बीड येथे संपन्न झाली. या कार्यशाळेस विभागीय कृषी सहसंचालक पी.आर. देशमुख छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक कृषी अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक माधुरी सोनवणे छत्रपती संभाजी नगर, जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी बीड, एस. एम. साळवे, नोडल अधिकारी तथा अधिक्षक्ष अभियंताव प्रशासक पल्लवी जगताप, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण बीड, डी.व्ही. जाधवर, कृषी उपसंचालक एस एस सय्यद, कृषी विकास अधिकारी बीड तसेच सर्व उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी येणाऱ्या आगामी खरीप हंगाम २०२५ ची पूर्वतयारी व नियोजना बाबत क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या विविध मोहिमा यामध्ये माती परिक्षण मोमि, घरगुती बियाणे उगवण क्षमता चाचणी मोहीम, बीज प्रक्रिया मोहिम, हुमणी किड निमंत्रण मोहीम, खरीप पिकाच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण मोहीम, कृषी निविष्ठांच्या वाजवी वापराबाबत जनजागृती मोहीम, आपत्कालीन पीक नियोजन कार्यशाळा प्रशिक्षण सत्रे इत्यादी करिता दिलेल्या वीत वेळ वेळापत्रकानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत पी.आर. देशमुख विभागीय कृषी सहसंचालक यांनी उत्कृष्ट सादरीकरणाद्वारे सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले. आगामी खरीप हंगामाकरिता खते, बियाणे व आवश्यक निविष्ठा यांचे मान्सून आगमनाच्या पूर्वीच तालुका न्याय पुरवठा नियोजन तसेच त्यांच्या गुणवत्ता नियंत्रणाच्या अनुषंगाने आवश्यक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, कृषी प्रर्यवेशक, मंडळ कृषी अधिकारी, कार्यालय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच सर्व तंत्र अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या विविध शेतकरी गटाच्या तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवराच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे तर आभार प्रदर्शन कृषी उपसंचालक डी.व्ही. जाधवर यांनी केले..सदर कार्यशाळेत जिल्ह्यातील कृषी विभागाचे सर्व कृषी सहाय्यक, कृषी प्रर्यवेशक, मंडळ कृषी अधिकारी, कार्यालय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, उपविभागीय कृषी अधिकारी तसेच सर्व तंत्र अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या विविध शेतकरी गटाच्या तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवराच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी एस.एम. साळवे तर आभार प्रदर्शन कृषी उपसंचालक डी.व्ही. जाधवर यांनी केले.





बीड –शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी नगर पालिकेने नविन पाईपलाईन जोडणी व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. शुक्रवारी (दि.१८) रोजी आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांनी पाईप लाईन जोडणीचे काम सुरू आसलेल्या उमरद खासला, म्हाळसजवळा येथे भेट दिली. सदरील काम वेळेत पुर्ण करून शहराला पाणीपुरवठा पुर्ववत करण्याच्या सुचना आ.क्षीरसागरांनी संबंधितांना दिल्या.

# रणजित कासले बडतर्फे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ एप्रिल**

येथील सायबर पोलिस ठाण्यातील वादग्रस्त निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले याच्यावर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला होता. तो गुरूवारी रात्री उशिरा पोलिसांना शरण येणार होता, परंतू तसे न करता तो एका लॉजवर जावून झोपला. आज सकाळी बीड पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. परंतू त्या आधीच गुरूवारी रात्री छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी कासले याला पोलिस खात्यातून डिसमीसचे आदेश काढले. अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी ही माहिती दिली.

# गोदावरी पात्रातील बॅरेजचे उन्हाळ्यात पुर्नभरण करण्यासाठी धोरणात्मक निर्णय करा

**तभा वृत्तसेवा**
**छ.संभाजीनगर दि.१८ एप्रिल**




दरवर्षी मार्च अखेर गोदावरी नदीपात्रातील सर्व बॅरेजचे पुर्नभरण करण्याचा धोरणात्मक निर्णय करावा, पैठण उजव्या कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी पाण्याचे एक आवर्तन वाढवावे, शहागड को. प. बंधाऱ्याची उंची वाढवून त्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करावे, पिण्याच्या पाण्यासाठी गोदावरी नदीपात्रात तात्काळ पाणी सोडावे यांसह विविध मागण्यांच्या अनुषंगाने आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी आ. विलास भुमरे, माजी आ. अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

जायकवाडी धरणाच्या पैठण उजवा कालवा आणि बॅरेजच्या अनुषंगाने सार्वजनिक महत्वाच्या विषयांच्या अनुषंगाने आ. विजयसिंह पंडित यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांच्यासह जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी पैठणचे आमदार विलास भुमरे पाटील, जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते. यावेळी पैठण उजव्या कालव्यातून उन्हाळी हंगामासाठी पाण्याचे नियोजन यासह इतर महत्वाच्या बाबींवर चर्चा झाली.या भेटी संदर्भात माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, जायकवाडी धरणातील पाणी वापराचे नियोजन करताना भविष्यात परिस्थितीनुरूप काही बदल करावे लागतील, गोदावरी नदी पात्रातील सर्व बॅरेजचे पुर्नभरण करण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचे मोजमाप करून मार्च अखेरीस त्याचे पुर्नभरण करण्याकरीता आवश्यक पाण्याचे नियोजन करून दरवर्षी मार्च अखेरीस बॅरेजचे पुर्नभरण करण्याचा धोरणात्मक निर्णय करावा लागणार आहे. शहागड को.प.बंधारा नादुरुस्त असल्यामुळे त्याच्यावर पिण्याच्या पाण्याचे अवलंबत्व लक्षात घेऊन या बंधाऱ्याची उंची वाढवून त्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याच्या अनुषंगाने यावेळी चर्चा झाली.

# नगरपालिका प्रशासक मुख्याधिकारी सीईओ यांनी बीडकरांना मुबलक पाणी उपलब्ध करून घ्यावे व नागरिकांचे पाण्याविना हाल करू नये-नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ एप्रिल**

बीड नगरपालिका व प्रशासक व मुख्याधिकारी सीईओ नीता अंधारे मॅडम बीड करांचे पाण्याविना हाल होत आहेत आपल्या थोडी दया येऊ द्या आणि बीडकरांना मुबलक असे पाणी उपलब्ध करून द्या मग बिघडलेले हातपंप दुरुस्त करा जे बिघडलेले बोरवेलस आहेत ते दुरुस्त करा ज्या विहिरीमध्ये गाळ आहे ते गाळ काढण्याचे काम प्रशासनाच्या मार्फत करा तथा बीड शहरांमध्ये टँकर द्वारे पाणीपुरवठा ज्या ज्या ठिकाणी करता येत असेल त्या त्या ठिकाणी आपल्या अधिकाऱ्याच्या व कर्मचाऱ्याच्या मार्फत सर्वे करून माहिती घ्या आणि बीड शहरामध्ये अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे मुके जनावरे रस्त्यावर फिरत असतात मग गाय असो शिळी असो बैल असो किंवा कुत्रे असोत यांची पाण्याच्या बाबतीत आपण दक्षता घेऊन अशा मुक्या जनावरांचा तरी आशीर्वाद घ्या आपण ठिकठिकाणी पानवट्या ठेवून त्याच्यामध्ये या मुक्या जनावरांसाठी नगर प्रशासनाच्या वतीने पाणी उपलब्ध करून द्या सध्या उन्हाची तीव्रता दिवसान दिवस वाढत असून कोणाचा पारा चढत आहे माणसाला साडेदहाच्या नंतर बाहेर येणे देखील मुश्किल झाले आहे मग अशा मुक्या जनावरांना देखील पाण्याविना भटकंती करावी लागत आहे.



बीड बस स्थानक येथे मोटरसायकलस्वार गेटवर गाडी लावत असल्यामुळे वाहतुकीसाठी अडथळा निर्माण होत आहे (छाया कृष्णा शिंदे)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# औंढा नागनाथ नगरीत जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा

## शहरातून महिलांची भव्य कलश यात्रा, जागोजागी पुष्पवृष्टी, विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

औंढा नागनाथ शहरात अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा १८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून कृषी उत्पन्न बाजार समिती प्रांगणात आयोजित केला होता.

औंढा नागनाथ शहरातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर पुतळ्याचे दर्शन घेऊन सकाळी ८ वाजल्यापासून पादुका मिरवणूकिस सुरुवात झाली. या मिरवणुकीत कलशधारी महिला, लेझीम पथक, ध्वजधारी पुरुष व महिला, विविध पथक व भजनी मंडळ सहभागी होते. जगद्गुरू श्रींचा नामघोष करत रथातून 'श्री' च्या पादुका व प्रतिमेची मिरवणूक करण्यात आली. ही मिरवणूक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, नवीन बसस्थानक, मुख्य बाजारपेठ, नगरपंचायत रोड, कासारगल्ली मार्गे कृषी उत्पन्न बाजार समिती येथील कार्यक्रम स्थळापर्यंत काढण्यात आली. कार्यक्रमाच्या ठिकाणी मिरवणूक पोहोचल्यानंतर तेथे प्रथम जगद्गुरु श्रींच्या पादुकांचे पूजन झाले.सभामंडपात भक्तगण सपत्नीक गुरुपूजन केले.त्यानंतर आरती सोहळा, जगद्गुरू श्री नरेंद्राचार्य महाराज लिखित श्री लीलामृत ग्रंथाचे पारायण यांचे प्रवचन झाले. त्यानंतर भक्त दीक्षा व पादुकांचे दर्शन झाले.त्यानंतर कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोष बांगर यांनीही पादुका दर्शन घेतले. त्यानंतर भाविकांनी दर्शन घेतले. जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या सामाजिक उपक्रमाअंतर्गत गोरगरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले.सायकली वाटप प्रसंगी आमदार संतोषराव बांगर, नगराध्यक्ष एस पी कनकुटे,पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, उपनगराध्यक्ष अनिल देव यांच्यासह नगरसेवक व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पादुकांवर पुष्पवृष्टी करून सर्व भाविकांनी दर्शन घेतले. त्यानंतर पाच वाजता भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यात हजारो भाविक सहभागी झाले होते. सोहळा कार्यक्रमास जिल्हा निरीक्षक विश्वनाथ इंगळे, जिल्हाध्यक्ष संतोष चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष नर्मदा काळे, जिल्हा कर्नल गजानन तरडे, जिल्हा युवाध्यक्ष राहुल सूर्यवंशी, जिल्हा सचिव रामचंद्र बागल, जिल्हा अध्यात्मिक प्रमुख नागोराव बागल, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संतोष वानखेडे, जिल्हा जनगणना प्रमुख शुभम ढवळे, औंढा तालुकाध्यक्ष गंगाधर देवकते, वसमत तालुकाध्यक्ष शंकर फेगडे, कळमनुरी तालुकाध्यक्ष गोविंद गव्हाणकर, हिंगोली तालुकाध्यक्ष राम जाधव, सेनगाव तालुकाध्यक्ष सदाशिव लाड, जिल्हा धर्मक्षेत्र प्रमुख अभिजीत सूर्यवंशी, जिल्हा संजीवनी प्रमुख अरुण शिंदे, जिल्हा सामाजिक प्रमुख संदीप लाड, औंढा तालुकाध्यक्ष अनिता कुलकर्णी, वसमत तालुकाध्यक्ष मीरा पांचाळ, हिंगोली तालुकाध्यक्ष रेखा गव्हाणकर, कळमनुरी तालुकाध्यक्ष मंगल पानपट्टे, रामराव कदम, प्रकाश कदम, लिंबाजी धनवे, काशिनाथ पाटील, धाराजी बोंगाणे यांच्यासह स्व- स्वरूप संप्रदाय व जिल्हा सेवा समिती यांनी अथक परिश्रम घेतले.

सोहळा कार्यक्रमाच्या ठिकाणी पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक अमोल इंगोले, जमादार ज्ञानेश्वर गोरे, माधव सूर्यवंशी, वशिम पठाण, अमोल चव्हाण, सुभाष जयताडे, विश्वनाथ ढोणे यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

# आज तीर्थदर्शन योजनेंतर्गत ज्येष्ठ नागरीक आयोध्येला जाणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**



मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतर्गत शनिवार दि १९ एप्रिल रोजी ८०० ज्येष्ठ नागरिक आयोध्या येथे श्रीराम लल्लांच्या दर्शनासाठी रवाना होणार आहेत. या पार्श्वभूमीवर हिंगोली रेल्वे स्थानकावर विशेष रेल्वेचे आगमन होणार असून १२ बोगीच्या रेल्वेत भाविकांच्या सोयीसाठी प्रत्येक बोगीमध्ये एक कर्मचारी नियुक्त करण्यात आला आहे. शुक्रवार दि १८ एप्रिल रोजी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी रेल्वे स्थानकाची पाहणी करीत परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

राज्य शासनाने विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना जाहीर केली होती. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने या योजनेची अंमलबजावणी केली जात असून ६० वर्षावरील नागरिकांचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्रती लाभार्थी ३० हजार रूपये खर्च करण्यात येतो. हिंगोली जिल्ह्यात १५०० प्रस्ताव आयोध्या दर्शनासाठी सादर करण्यात आले होते. त्यापैकी ८०० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. बऱ्याच दिवसांच्या प्रतिक्षेनंतर या योजनेचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना मिळणार आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता हिंगोली रेल्वे स्थानकाहून आयोध्यासाठी विशेष रेल्वे रवाना होणार आहे. परतीचा प्रवास दि २१ रोजी आयोध्या येथून होणार असून दि २३ एप्रिल सकाळी अकरा वाजता लाभार्थी हिंगोलीत परत येतील. भाविकांच्या चहा, नाश्ता, भोजनाची व्यवस्था रेल्वेत करण्यात येणार आहे.

# बुधवारी हिंगोली तालुक्यातील १११ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

जिल्हाधिकारी हिंगोली यांनी अधिसूचित केल्यानुसार हिंगोली तालुक्यातील १११ ग्राम पंचायतीतून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यातील महिलासह) प्रवर्गाच्या सरपंचाची पदे सन २०२५-२०३० साठी आरक्षित करावयाचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार हिंगोली तालुक्यातील १११ ग्रामपंचायतीचे निश्चित करण्यात आलेल्या संख्येइतकी सरपंच पदाची निवड सर्वांसमक्ष थेट, चिठ्ठी सोडत पध्दतीने आरक्षित करण्यासाठी बुधवार (दि.२३)/रोजी दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली येथील सभागृहात सभा आयोजित करण्यात आली आहे. आयोजित सभेस हिंगोली तालुक्यातील १११ ग्रामपंचायतीच्या सर्व नागरिकांनी उपस्थित राहावेत, असे आवाहन तहसीलदार, हिंगोली यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### चारचाकी संवर्गासाठी नवीन वाहन क्रमांक मालिका

हिंगोली- यापूर्वीची मोटार कार, ट्रॅक्टर, ट्रॉली संवर्गासाठीची मालिका एमएच-३८-एडी ही संपुष्टात आल्यामुळे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नवीन मालिका एमएच-३८-एके०००१ ते ९९९९ ही मालिका चालू करण्यात येत आहे. ज्या वाहन मालकांना वाहनासाठी आकर्षक क्रमांक राखीव करावयाचा आहे. त्यांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून किंवा ऑनलाईन पध्दतीने आपला आकर्षक क्रमांक विहित शासकीय शुल्क भरुन राखीव करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी केले आहे.

### मार्चअखेरचे विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन

हिंगोली- सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच खाजगी आस्थापनांनी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, हिंगोली यांच्याकडे आपल्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची माहितीबाबतचे माहे मार्च,२०२५ अखेरचे ईआर-१ त्रैमासिक विवरणपत्र संकेतस्थळावर दि. ३० एप्रिल,२०२५ पर्यंत ऑनलाईन भरावेत. माहे एप्रिल-२०२५ ची मासिक वेतन देयके दाखल करताना ईआर-१ भरुन दिल्याचे ऑनलाईन प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. याशिवाय एप्रिल, २०२५ ची वेतन देयके स्वीकारले जाणार नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच सर्व कार्यालयांना जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,हिंगोली या कार्यालयामार्फत युजर आयडी व पासवर्ड यापूर्वीच कळविण्यात आलेले आहेत. त्यानुसार सर्व कार्यालयानी आपला ई-मेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक, पत्ता, टॅन क्रमांक, पॅन क्रमांक टाकून आपली प्रोफाईल अद्यावत करावी, असे आवाहन सहायक आयुक्त , कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, हिंगोली यांनी केले आहे.

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली- राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे एप्रिल, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. २१ एप्रिल) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

# काँग्रेसच्या बैठकीत आ. डॉ. सातव यांच्याविरूध्द कार्यकर्त्यांचा रोष



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

औंढा नागनाथ येथे काँग्रेस पक्षाच्या निरीक्षकांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत कार्यकर्त्यांनी विधान परिषद सदस्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांच्याविरूध्द रोष व्यक्त केला. त्यामुळे काँग्रेसची ही बैठक राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे.

हिंगोली जिल्ह्यात काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षांच्या निवडीसह पक्ष वाढ, संघटन वाढीसाठी पक्ष निरीक्षक कल्याण दळे, जिल्हा प्रभारी ॲड सचिन नाईक, सहप्रभारी श्रावण रॅपनवाड, समन्वयक विनायक देशमुख, प्रदेश सरचिटणीस अब्दुल हाफीज यांच्या प्रमखउपस्थितीमध्ये औढा नागनाथ येथे काँग्रेसच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत कार्यकर्त्यांनी आ. प्रज्ञा सातव कार्यकर्त्यांना भेटत नाहीत. तसेच पक्ष संघटनाबद्दल सहकार्य मिळत नाही याशिवाय मतदार संघातील विकास कामांसंदर्भात निधी उपलब्ध करून जात नसल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. त्यामुळे बैठकीचा मुळ अजेंडा बाजूलाच राहून उपस्थित पदाधिकाऱ्यांना कार्यकर्त्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे काँग्रेसची औंढा नागनाथ तालुका बैठक जिल्हाभरात चर्चेचा विषय बनली आहे.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक सप्ताहाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह सोहळा दिनांक ८ ते १४ एप्रिल या दरम्यान साजरा करण्यात आला. सामाजिक समता सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहात सकाळी ६ ते सायकांळी ६ वाजेपर्यंत अभ्यास सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

तसेच समाज कल्याणचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, सार्वजनिक पुतळा समितीचे अध्यक्ष मधुकर मांजरमकर यांच्यासह सामाजिक न्याय विभागाचे सर्व कर्मचारीवृंद यांच्या समवेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेअंतर्गत जमीन वाटप करण्यात आले. ८५ लाभार्थी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सहायक आयुक्त यादव गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून आत्माराम वागतकर, विनोद ठाकरे, विशाल इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते. सायंकाळी ६ वाजता मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहामध्ये सामाजिक समता सप्ताहाचा समारोप करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी सहायक आयुक्त यादव गायकवाड, तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त श्रीमती छाया कुलाल, पंडित अवचार, आत्माराम वागतकर, नितीन राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. समारोपाच्या दिवशी दिवसभर १२ तास अभ्यास करुन महामानवास अभिवादन केलेल्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या समारोप कार्यक्रमास विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# औंढा पं. स. चे संतोष काळे यांची गुणवंत कर्मचारी पुरस्कारासाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

पंचायत समिती मधील कार्यासन पंचायत आस्थापना-१वरिष्ठ सहाय्यक संतोष तान्हाजी काळे यांनी २०२३-२४ या वर्षात उत्कृष्ट काम केले .याबद्दल गुणवंत कर्मचारी म्हणून शासनाने घोषित केले.

सन २०२२-२०२३ यावर्षी ग्राम विकास विभागातील मंत्रालयातील व क्षेत्रिय स्तरावरील गुणवंत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. औंढा पंचायत समितीमधील वरिष्ठ सहाय्यक संतोष काळे यांची गुणवंत कर्मचारी या पुरस्कारासाठी निवड झाल्याने पंचायत समितीमधील कर्मचारी यांनी त्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी गटविकास अधिकारी गोपाळराव कल्हारे, सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, चंद्रशेखर बोरले, राधेश्याम परांडकर, शेख जमीर, मनोहर तुमराम, मुरलीधर जाधव, गजानन वाघमारे, शेख कलीम, अक्षय बगाटे, सुमित शिंदे, नितीन हजारे, अंबादास कुहीरे, अमित गायकवाड,विशाल इंगोले ,पिराजी हाके, सचिन राठोड, एस गायकवाड सत्कार कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन मनोहर तुमराम तर आभार अक्षय बगाटे यांनी मानले.

# राष्ट्रीय कबड्डीपटू तथा माजी सैन्य दलातील अधिकारी शेर खान यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ एप्रिल**

येथील रहिवाशी भारतीय संघातील उत्कृष्ट खेळाडू हिंगोली चे रहिवाशी, मार्गदर्शक, पंच व खेळाडू अशा अनेक भूमिका ज्यांनी स्पर्धेच्या क्रीडांगणत केलेला होत्या असे उत्तुंग व्यक्तिमत्व शेरखान याकूब खान पठाण यांचे वयाच्या ७० व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. भारतीय सैन्यात देश सेवा केलेले माजी सैनिक व हिंगोलीच्या जिल्हा परिषद शाळेतील शालेय जीवनात कबड्डी खेळाडू.कब्बडी खेळामुळे ओळख त्या ओळखीतूनच भारतीय सैन्यामध्ये रुजू झाले त्यानंतर भारतीय सैन्याला शेरखान पठाण हा उत्कृष्ट खेळाडू मिळाला. त्यांनी सैन्याला प्रत्येक सामन्यात यश मिळवण्यासाठी व्यक्तिगत व सांघिक प्रयत्न केले. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर भारतीय सैन्याला अनेक वेळेला विविध स्पर्धांमध्ये विजेतेपद प्राप्त झाले. त्यांची भारतीय सैन्य कब्बडी संघात निवड झाली.

आज त्यांच्यावर दुपारी दोन वाजता हिंगोली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पाच भाऊ असा मोठा परिवार आहे. त्यांच्या दुःखद निधनामुळे क्रीडा क्षेत्रावर शोककळा पसरलेली आहे.